आणि साच चि जरि नाहिं । तरि महदादि कवणी ठांइं ।
स्फुरत कैंचें काइ । तेणेंविण ॥ ८६७ ॥

ह्मणौनि आथि नाहिं हे बोली । जें दैखौनि मूंकि जालि ।
विचाराची मोडली । वाट जेथ ॥ ८६८ ॥

भांडघटशराविं । जैसी तदाकार असे पृथवी ।
तैसें सर्व होउनि सर्वीं । असे जें वस्तु ॥ ८६९ ॥

आणि ज्ञेय परब्रह्मवस्तू खरोखरच नाही, असे म्हणावे तर महत्तत्त्वादि
कोणाच्या ठिकाणीं स्फुरतात ? आणि त्यावांचून दुसरें आहे तरी काय ?

म्हणून परब्रह्माचे ठिकाणी, आहे नाही असें कांहीच बोलता न येऊन
वेदांचीही वाणी मुकी झाली, आणि विचारशक्तीची वाट जेथें खुंटते;

ज्याप्रमाणें मातीपासून तयार केलेले डेरे, घागरी, परळ या रूपें तदाकार झालेली
पृथ्वीच असते, त्या प्रमाणें ही ब्रह्मवस्तू सर्व जगतांत सर्व पदार्थ होऊन राहिली आहे.

सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।
सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥ १४ ॥

सर्वतः, पाणि, पादम्, तत्, सर्वतः, अक्षि, शिरः, मुखम्,
सर्वतः, श्रुतिम्, लोके, सर्वम्, आवृत्य, तिष्ठति

ज्याला हातपाय सर्वत्र आहेत, त्याचे नेत्र, शिरें आणि मुखें सर्वत्र आहेत.
सर्व बाजूंनीं कान आहेत; आणि तें सर्वाला व्यापून राहिलें आहे.

आघवां चि देशिं काळिं । नोहे चि देशकाळा वेगळी ।
जे क्रिया स्थूळास्थूळीं । ते चि हात जेया ॥ ८७० ॥

तेयातें एयाकारणें । विश्वबाहु हें ह्मणणें ।
जें सर्व चि सर्वपणें । सदा करी ॥ ८७१ ॥

आणि समस्ता ही ठाया । एकी चि काळिं धनंजया ।
आलें असे ह्मणौनियां । विश्वांघ्रि नांव ॥ ८७२ ॥

पैं सवितेया आंग डोळे । हें नाहिं वेगळवेगळें ।
तैसें सर्वद्रष्टें सकळें । स्वरूपें जें ॥ ८७३ ॥

ह्मणौनि विश्वतश्चक्षु । हा अचक्षुचा ठांइं पक्षु ।
बोलावेया दक्षु । जाला वेदु ॥ ८७४ ॥

पैं गा मूर्त्ति तें चि मुख । हुताशना देख ।
तैसें सर्वत्र अशेष । भोक्तें जें ॥ ८७५ ॥

सर्व स्थळीं व काळीं स्थळकाळापासून वेगळी न पडतां आणि
सूक्ष्मा कडून जी घडते, ती क्रिया, हेच ज्याचे हात आहेत.

त्या ब्रह्माला या कारणामुळेंच विश्वबाहू असें म्हटलें आहे; कां
कीं तें ब्रह्मवस्तूच सर्वकार होऊन सर्व क्रिया सदा करीत असतें;

अणि अर्जुना, तें सर्व ठिकाणीं एकसमयावच्छेदें करून असतें, म्हणून त्याला
विश्वांघ्री म्हणजे जिकडे तिकडे सर्वत्र पाय आहेत, असे नाव प्राप्त झाले आहे,

जसें सूर्याला अंग व डोळे, हे वेगळे वेगळे नाहींत, तर सर्व बिंबच
प्रकाशैकस्वरूप असतें, त्या प्रमाणे जे आत्मस्वरूप सर्वरूपाने सर्वद्दष्ट आहे,

म्हणूनच जाणत्या वेदाने चक्षुरिंद्रियरहित आत्मस्वरूपाला
मोठ्या शहाणपणानें विश्वतश्चक्षु असें म्हटलें आहे.

अर्जुना, असें पाहा कीं. अग्नीच्या ठिकाणीं जसें अग्नीचें स्वरूप,
तेच त्याचे मुखच असते तसें जें सर्व अंगानें सर्व भोगीत आहे;

एयालागि जेथ पार्था । विश्वतोमुख हे व्यवस्था ।
आली वाक्पथा । श्रुतीचेया ॥ ८७६ ॥

आणि वस्तुमात्रिं गगन । जैसें असे संलग्न ।
तैसें शब्दजातिं कान । सर्वत्र जेया ॥ ८७७ ॥

ह्मणौनि आह्मीं तेंयातें । ह्मणों सर्वत्र आइकतें ।
एवं जें सर्वांतें । आवरूनि असे ॥ ८७८ ॥

यऱ्हविं तऱ्हीं महामती । विश्वतश्चक्षु या श्रुती ।
तेयाचिये व्याप्ती । रूप केलें ॥ ८७९ ॥

वांचूनि हस्तनेत्रपाए । हे भाक काय तेथ आहे ।
सर्व शून्याचा साहे । निष्कर्ष जें ॥ ८८० ॥

पैं कल्लोळातें कल्लोळें । ग्रासिजत असें ऐसें केलें ।
परि ग्रसितें ग्रासा वेगळें । असे काइ ॥ ८८१ ॥

तैसें सर्वादि जें एक । तेथ कें व्याप्यव्यापक ।
परि बोलावेया नांव एक । करावें लागे ॥ ८८२ ॥

पैं शून्य जें दावावें जालें । तैं बिंदुलें एक केलें ।
तैसें अद्वैत दावावें बोलें । द्वैत चि कीजे ॥ ८८३ ॥

ह्मणौनि गा पार्था । गुरुशिष्यसत्पथा ।
आडळु पडे सर्वथा । बालु खुंटे ॥ ८८४ ॥

ह्मणौणि गा श्रुतीं । द्वैतभावें अद्वैतीं ।
निरोपणा वाहाती । वाट केली ॥ ८८५ ॥

तें चि आतां अवधारीं । ये नेत्रगोचरे आकारिं ।
तें ज्ञेय जेयापरीं । व्यापूनि असे ॥ ८८६ ॥

अर्जुना, या साठीं त्याचे साठीं
विश्वतोमुख असे श्रुतीला म्हणावे लागले.

आणि आकाश ज्याप्रमाणें सर्व वस्तूंत ओतप्रोत भरलें
आहे, त्या प्रमाणें शब्दमात्राबरोबर त्याचे श्रवण आहेत.

म्हणुनच त्या ब्रह्माला, आम्ही सर्वत्र ऐकणारे, असें
म्हणतो. कारण जे सर्व पदार्थमात्राला व्यापून आहे,

हे महामते अर्जुना, ब्रह्माची याप्रमाणें व्याप्ती असल्यामुळें
विश्वतश्चक्षु इत्यादी वर्णन वेदांनी केलें आहे

एरवीं ब्रह्म हें सर्व शून्यपणाचा शेवट आहे, हा सिद्धान्तही जेथे लागू पडत
नाही त्या ब्रह्मवस्तूच्या ठिकाणीं हात, पाय, डोळे हें बोलणेकोठें आहे ?

एका लाटेनें दुसऱ्या लाटेला गिळून टाकलें असें दिसतें, परंतु
ती थोरली लाट त्या लहान लाटेपासून वेगळी का आहे ?

त्याचप्रमाणें जें एक ब्रह्मवस्तूच सत्य आहे, तिथें हें व्याप्य, हें व्यापक, ही भाषा संभवेल
कशी ? परंतु तें स्पष्ट करून दाखविण्याकरितां, क्षणभर असें बोलावें लागतें.

असें पाहा, शून्य जर दाखवावावयाचें असलें, तर त्याचें दर्शक म्हणुन एक बारीक
टिंब काढावें त्याप्रमाणेंच शब्दांने अद्वैत सांगूं गेलें म्हणजे द्वैताची भाषा योजावीच लागते.

अर्जुना, अद्वैताचें वर्णन करण्याकरितां द्वैत अंगीकारलें
नाहीं तर गुरुशिष्यसंप्रदाय चहूंकडे बंद पडेल,

म्हणून श्रुतींनीं द्वैताविषयीं स्पष्टीकरण करून अद्वैत समजून
देण्याकरिता द्वैतभावाने निरूपण करण्याची वाट वाहती केली

या संपूर्ण डोळ्याने दिसणाऱ्या नामरूपात ते
ज्ञेय ज्या प्रकारें व्यापक असतें, तें आतां ऐक.

सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितम् ।
असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥ १५ ॥

सर्व, इन्द्रिय, गुण, आभासम्, सर्व, इन्द्रिय, विवर्जितम्,
असक्तम्, सर्वभृत्, च, एव, निर्गुणम्, गुणभोक्तृ, च

सर्व इंद्रियें व गुण यांच्या आकारानें तें भासतें, पण जे सर्व मन, इंद्रिये व गुण यापासून निराळे आहे,
कोठेंही सक्त नसून सर्वांना धारण करणारें आहे; तें निर्गुण असूनही सर्व गुणांचे पालन करणारें आहे,

तरि तें गा ऐसें । अवकाशिं आकाश जैसें ।
पटीं पटु होउनि असे । तंतु जेवि ॥ ८८७ ॥

उदक होउनि उदकिं । रसु जैसा अवलोकीं ।
दीपपणें दीपकीं । तेज जैसें ॥ ८८८ ॥

कर्पूरत्वें कापुरीं । सौरभ्य असे जियापरीं ।
शरीर होउनि शरीरीं । कर्म जेवि ॥ ८८९ ॥

किंबहुना ऐसें पांडवा । सोनें सोनयांचा रवा ।
तैसे जें या सर्वा । सर्वांगीं असे ॥ ८९० ॥

परि रवेपणामाझिवडें । तंव रवा ऐसें आवडे ।
वांचूनि सोनें सोनेयां सांगडें । सोनें चि जेवि ॥ ८९१ ॥

पैं गा वोधू चि वांकुडा । परि पाणी उजू सुहाडा ।
वन्हि आला लोखंडा । लोह नव्हे ॥ ८९२ ॥

घटाकारें वेंटाळलें । तैं नभ गमे वाटुळें ।
मठिं तरि चौफळें । आयें दिसे ॥ ८९३ ॥

परि ते आकार जैसे । नोहिजती चि आकाशें ।
तेवि विकारु होउनि तैसें । विकारी नोहे ॥ ८९४ ॥

मन मुख्य इंद्रियां । सत्वादि गुणा येया ।
सारिखें ऐसें धनंजया । आवडे कीर ॥ ८९५ ॥

हें पहा अर्जुना, तें ब्रह्म म्हणजे, जसें अवकाशाच्या ठिकाणीं आकाश
व्यापून आहे, किंवा वस्त्राचे ठिकाणी सूतच वस्त्ररूप होऊन राहिले आहे;

हें बघ, रस ज्याप्रमाणें उदकामध्यें उदकरूप होऊन असतो,
किंवा तेज, दिव्याचे ठिकाणी दिव्याच्या रूपाने राहते

ज्या प्रमाणें कापुरामध्यें सुगंध कापूर होऊन असतो,
व क्रिया शरीराच्या रूपानें शरीरांत दृष्टीस पडते,

किंबहूना अर्जुना, सोनें ज्याप्रमाणें सोन्याच्या रव्याच्या रूपानें दृष्टीस पडतें,
सत्त्व तसें तें ब्रह्मवस्तु सर्वस्वरूप होऊन सर्वांस अंतर्बाह्य व्यापून असतें.

तें सोनें ज्यावेळेस रव्याच्या रूपानें दृष्टीस पडतें, तोपर्यंत त्याला आपण सोन्याचा
रवा म्हणून ओळखतो, पण वास्तविक पाहिलें तर, सोनें, हें जसें सोन्यासारखें आहे;

अर्जुना, पाण्याचा ओघ जरी वाकडां असला तरी पाणी सरळच असतें,
आणि वन्हीने लोखंड तप्त झाले तरी अग्नी कांहीं लोखंड होत नाहीं,

घटाच्या आकारानें आकाश वाटोळें दिसतें, व मठामध्यें
सापडलेलें आकाश हें चौकोनी आकाराचें दिसतें;

परंतु तो वाटोळा किंवा चौरस आकार आकाशाला खरोखर नसतो,
तसेच ब्रह्म हे विकारी झाल्यासारखे दिसले तरी ते विकारी नव्हे.

अर्जुना ! इंद्रिये, सत्वादिगुण ज्यात मन मुख्य आहे, आणि
सत्त्व इत्यादी तीन गुणांनीं आकारलें आहे असें वाटतें;

पैं गुळाची गोडी । नव्हे बांधेया सांगडी ।
तैसीं गुणेंद्रिये फुडीं । नाहिं तेथ ॥ ८९६ ॥

आगा क्षीराचिये दशे । घृत चि क्षीराकारें असे ।
परि क्षीर चि नव्हे जैसें । कपिध्वजा ॥ ८९७ ॥

तैसें जें इये विकारिं । विकारु नव्हे अवधारिं ।
परि आकारु नांव भंवरी । सोनें तें सोनें ॥ ८९८ ॥

या उघड मऱ्हाटिया । तें वेगळेपणें धनंजया ।
जाण गुणेंद्रियां- । पासौनियां ॥ ८९९ ॥

नामरूपसंबंधू । जातिक्रियाभेदु ।
हा आकारासि चि प्रवादु । वस्तुसि नाहिं ॥ ९०० ॥

जें गुण नोहे कहिं । गुणा तेया पाडु नाहिं ।
परि तेयाचां चि ठांइं । आभासति ॥ ९०१ ॥

एतुलेयासाठिं । सभ्रांताचां पोटीं ।
ना ऐसें गमे किरीटी । जें हें धरी ॥ ९०२ ॥

तरि तें गा धरणें ऐसें । अभ्रातें जेवि आकाशें ।
कां प्रतिवदन जैसें । आरिसेनि ॥ ९०३ ॥

नातरि सूर्यप्रतिमंडळ । जैसें धरीं सलील ।
रश्मिकरें मृगजळ । धरिजे जेवि ॥ ९०४ ॥

तैसें गा संबंधेविण । यां सर्वांतें निर्गुण ।
परि तें वायां जाण । मिथ्या दृष्टी ॥ ९०५ ॥

आणि इयापरि निर्गुणें । गुणातें भोगणें ।
रंका राज्य करणें । स्वप्निं जेवि ॥ ९०६ ॥

परंतु गुळाची गोडी ही गुळाच्या आकारात नसते, ती अमूर्त व भावात्मकच असते, त्या प्रमाणें ब्रह्मवस्तूच्या ठिकाणीं गुण व इंद्रियें हीं खरोखर नाहींत.

हे अर्जुना ज्याप्रमाणे दुधाच्या अवस्थेत तूप हें दुधाच्या आकाराचें असते. परंतु तें दूध म्हणजे तूप नव्हे,

त्याप्रमाणे तें ब्रह्म विश्वांत भरलेले असून विश्व नव्हे. जसें आकार धारण केलेल्या सोन्याचें नांव बुगडी, पण मूळ सोनें तें सोनेच !

अर्जुना, हें उघड, मराठीं, सोप्या भाषेंत सांगायचें, तर सत्वादि गुण व इंद्रिये यांच्या पासून ते ज्ञेय वेगळेपणानेच असते, असे जाण.

नामरूपाचा संबंध आणि जातिक्रियादिक भेद ही भाषा केवळ आकाराचेच बाबतीत संभवते, त्यांची भाषा ब्रह्मवस्तूला मुळींच लागू पडत नाहीं,

तें ब्रह्म कधीही गुण होत नाही गुणांचा व त्याचा संबंध नाही, मात्र हे गुण त्या ब्रह्मवस्तूच्या ठायीं भासमान होतात,

म्हणूनच अज्ञानाने भ्रांत झालेल्या जीवांना, वाटते की गुण हे ब्रह्माचेच आहेत व हीच गोष्ट तो खरी मानतो.

परंतु ब्रह्माच्या ठिकाणीं गुण आहेत असें मानणें म्हणजे, तर आकाशानें जसे अभ्रपटल धारण करावें, किंवा आरशांत मुखाचें प्रतिबिंब दिसावें.

पाणी जसे सूर्याच्या प्रतिबिंबाला धारण करतें, किंवा सूर्य किरण जसे मृगजळास धारण करतात;

अर्जुना, त्या प्रमाणें वास्तविक संबंधावांचून, या सर्व विकारांना तें निर्गुण ब्रह्म आधार होतें. परंतु हें म्हणणें भ्रममूलक असल्यामुळें व्यर्थ आहे.

जसें स्वप्नामध्यें एखाद्या रंकाने राज्य करावें, त्याप्रमाणें ब्रह्म गुणाला भोगतें हें म्हणणें व्यर्थ होय.

ह्मणौनि गुणाचा संगु । अथवा गुणभोगु ।
हा निर्गुणिं गुणलागु । बोलों चि नये ॥ ९०७ ॥

तर निर्गुण परब्रह्माच्या ठायी गुणांचा संग आहे किंवा गुणांचा
उपभोग असा संबंध लावून निर्गुणस्वरूपाविषयी बोलता येत नाही.

बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च ।
सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दुरस्थं चान्तिके च तत् ॥ १६ ॥

बहिः, अन्तः, च, भतानाम्, अचरम्, चरम्, एव, च,
सूक्ष्मत्वात्, तत्, अविज्ञेयम्, च, अन्तिके, च, तत्तें

सर्व भूतांच्या बाहेर असून आंतही आहे; तें अचर आहे आणि चरही आहे; तें
सूक्ष्म असल्यामुळें जाणतां येत नाहीं; तसेच तें दूर आहे व समीपही आहे.

जें चराचरा भूतां- । माझि असे पांडुसुता ।
नाना वन्हि उष्णता । अभेद जेवि ॥ ९०८ ॥

हे पंडुसुता, ब्रह्म चराचर भूतांमध्यें जरी दृष्टीस पडलें, तरी तें एकच आहे. अग्नीचे
निखारे जरी पुष्कळ असले तरी उष्णता जशी समभावानें त्यांस व्यापून असते,

तैसेनि अविनाभावें । सूक्ष्मदशे आघवें ।
व्यापूनि असे तें जाणावें । ज्ञेय एथ ॥ ९०९ ॥

त्या प्रकारच्या अविनाशरूपानें व सूक्ष्म स्थितीनें
सर्व पदार्थांनाव्यापून आहे. ते ज्ञेय होय असे जाण.

जें एक आंतु बाहिरि । जें एक जवळें दूरी ।
जें एकवांचूनि परि । दुसरी नाहिं ॥ ९१० ॥

जें एकच आंतबाहेर, जवळ-दूर, असतें
आणि व जें एकच असून ज्यांत द्वैत नाही;

अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम् ।
भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च ॥ १७ ॥

अविभक्तम्, च, भूतेषु, विभक्तम्, इव, च, स्थितम्,
भूतभर्तृ, च, तत्, ज्ञेयम्, ग्रसिष्णु, प्रभविष्णु, च,

तें ब्रह्म अविभक्त आहे, तेच शरीराच्या भिन्नत्यामुळे सर्व भूताचे ठिकाणी तें विभागलेलें
दिसतें. भूतांचे पालन करणारें, ग्रास करणारें आणि पुन्हा त्यांस उत्पन्न करणारें आहे.

क्षीरसागरीचि गोडी । माजि बहुत थडिये थोडी ।
हें नाहिं तेया परवडी । पूर्ण जें गा ॥ ९११ ॥

अर्जुना, क्षीरसमुद्राची गोडी, क्षीरसागराच्या मध्यभागीं फार व किनाऱ्यावर
थोडी असते असे नाही, त्याप्रमाणे जें सर्वत्र सारखेंच परिपूर्ण असतें;

स्वेदजादिप्रभूती । वेगळालां भूतिं ।
जेयाचिये अनस्यूती । खोमणें नाहिं ॥ ९१२ ॥

जारज, अंडज, स्वेदज व उद्भिज्ज या सर्व वेगळाल्या
भूतांच्या ठिकाणी ज्याची व्याप्ती कमी जास्त नाही,

पैं श्रोतेमुखटिळका । घटसहस्त्रां अनेकां ।
बिंबौनिया चंद्रिका । न भेदे जेवि ॥ ९१३ ॥

हे श्रोत्यांच्या भूषणभूत अर्जुना, हजारो घटांच्या निराळ्या आकारांत
चंद्राचें बिंब पडलें असतांही, चंद्रबिंबास अनेकता येत नाही;

नाना लवणकणाचिया रासी । क्षारता एकि जैसी ।
कां कोडी एके उंसीं । एकु चि रसु ॥ ९१४ ॥

तैसी अनेकिं भूतजातिं । असे एक चि व्याप्ति ।
विश्वकार्या सुमती । कारण जें ॥ ९१५ ॥

ह्मणौनि हा भूताकारु । जेथौनि तें चि आधारु ।
कल्लोळिं सागरु । जेयापरिं ॥ ९१६ ॥

पैं बालादि तिहिं वयसिं । काया एकी चि जैसी ।
तैसें आदिस्थितिग्रासिं । अखंड जें ॥ ९१७ ॥

सांयप्रातर्मध्यान्हीं । होंत जांत दिनिदिनीं ।
जैसें कां गगनीं । पालटु नाहिं ॥ ९१८ ॥

आगा श्रृष्टिवेळे प्रियोत्तमा । जेया नांव ब्रह्मा ।
व्याप्ति जें नामा । पात्र जालें ॥ ९१९ ॥

मग आकारु हा हारपे । तेधवां रुद्र जें ह्मणिपे ।
तें हिं गुणत्रय लोपे । तैं जें शून्य ॥ ९२० ॥

किंवा मिठाच्या खड्यांच्या राशींत जसा एकच खारेपणा असतो,
अथवा मोळीभर ऊंस जरी असला तरी त्या सर्वांची गोडी सारखीच असते,

हे सुबुद्धी अर्जुना, तशीं अनेक भूतमात्रांत ज्याची एकत्वानें
व्याप्ती आहे, आणि विश्वरूपी कार्याचें जें कारण आहे,

म्हणून ज्याप्रमाणें लाटा समुद्रापासून उत्पन्न होतात, त्याप्रमाणे ज्या ज्ञेया
पासून हा भूताकार उत्पन्न झाला, तेंच ब्रह्म, त्या भूतकराला आधार आहे.

बाल्यादि तिन्ही अवस्थांमध्ये जसें एकच शरीर आधारभूत असतें,
तसे आदि, मध्य व अंत, या तिन्ही अवस्थांस जें आधारभुत आहे,

सायंकाल, प्रातःकाल व मध्यानकाल, हे दिनमान होत जात
असताना तरी या तिन्ही काळी आकाश न पालटता ते तसेच राहते,

हे प्रियोत्तमा अर्जुना, जगाच्या उत्पत्तीच्या कालीं, जें ब्रह्मा हें नांव
पावलें, विश्वाच्या स्थितीकाळीं ज्याला विष्णू ही सज्ञा मिळाली,

मग जेव्हां हा जगदाकार मायेत नाहीसा होतो, तेव्हा ज्याला रुद्र म्हणतात
आणि हेंही गुणत्रय लोपून गेलें म्हणजे जें ब्रह्म शून्य होऊन राहतें;

ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते ।
ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य धिष्ठितम् ॥ १८ ॥

ज्योतिषाम्, अपि तत्, ज्योतिः, तमसः, परम, उच्यते
ज्ञानम्, ज्ञेयम्, ज्ञानगम्यम्, हृदि, सर्वस्य, अधिष्ठितम्

त्यालाच तेजाचेंही तेज आणि अंधाराच्याहि पलीकडील असें ह्मणतात. ज्ञान
तरी तेंच आहे, ज्ञेय तेंच आहे, ते सर्वाच्या हृदयांत अधिष्ठित झालेले आहे.

जें अग्नीचें दीपन । जें चंद्राचें जीवन ।
सूर्याचे नयन । देखति जेणें ॥ ९२१ ॥

आदिसि जे आदि । जे वृद्धीसि वृद्धि ।
बुद्धीसि बुद्धि । जीवाचा जीउ ॥ ९२२ ॥

जें ब्रह्म अग्नीला प्रकाशमान करणारे आहे, व चंद्राला जीवन
देणारें आहे; सूर्याचे डोळे देखील ज्याच्या योगाने पाहू शकतात;

जें ब्रह्म आरंभाचा आरंभ आहे आणि वृद्धीचीही
वाढ असते, व जें जीवाचा जीव आहे,

जेयाचेनि उजियडें । तारागण उघडे ।
महातेज सुरवाडें । जेणें राहाटे ॥ ९२३ ॥

मनाचें मन । जें नेत्राचे नयन ।
जें घ्राणाचें घ्राण । वाचेची वाचा ॥ ९२४ ॥

जें प्राणाचे प्राण । जें गतीचे चरण ।
क्रियेसि कर्त्तेपण । जेयाचेनि ॥ ९२५ ॥

आकारु जेणें आकारे । विस्तारु जेणें विस्तारे ।
संहारु जेणें संहारे । पांडुकुमरा ॥ ९२६ ॥

जें मेदिनियेची मेदिनी । जें पाणी पीउनि असे पाणी ।
तेजा दिवेलागणी । जेणे तेजें ॥ ९२७ ॥

जें वायुचा श्वासोश्वासु । जें गगनाचा अवकाशु ।
आघवा चि अभासु । आभासे जेणें ॥ ९२८ ॥

किंबहुना पांडवा । जें आघवें चि इये आघवां ।
जेथ नाहिं रिगांवा । द्वैतभावां ॥ ९२९ ॥

जें देखिलेया चि सवें । द्दष्टा द्दश्य आघवें ।
एकवाट कालवे । सामरस्यें ॥ ९३० ॥

मग तें चि होये ज्ञान । ज्ञाता ज्ञेय हान ।
ज्ञानें गमिजे स्थान । तें हि तें चि ॥ ९३१ ॥

सरलेयां लेख । जैसें आंख होंति एक ।
तैसें साध्यसाधनादिक । ऐक्यते ये ॥ ९३२ ॥

अर्जुना जिये ठांइं । सरे द्वैताची लिही ।
हें असो हृदयीं । सर्वांचां असे ॥ ९३३ ॥

ज्याचे तेजानें तारांगणास तेज प्राप्त होते;
आणि ज्याच्या तेजाने सूर्य सुखानें वावरतो;

मनाचे मन आहे, जें डोळ्यांचा डोळा
आहे, कानाचे कान, वाचेची वाचा, आहे,

जे प्राणाचाही प्राण आहे व जे गतीचे पाय
असून व ज्यामुळें क्रियेस कर्तेपणा येतो;

अर्जुना , ज्याच्या योगाने आकार आकाराला येतो, विस्तार
विस्ताराला जातो, ज्याच्या योगाने संहार देखील संहार करतो,

जे पृथ्वीची पृथ्वी आहे, ज्या ब्रह्मरूप पाण्याला पिऊन पाणी हे
पाणीपणानें असतें, ज्याच्या तेजानें तेजास प्रकाश दिला जातो.

जे ब्रह्म वायूचा श्वासोच्छ्वास आहे व ज्या ब्रह्मरूपी पोकळींत आकाश राहीलें
आहे; फार काय सांगावें ? हा सर्व जगद्रूपी भास ज्याच्या योगाने भासतो;

हे पांडवा, या सर्व जगतांत जें आदिकारण
असून व जेथें द्वैतपणाचा प्रवेश होत नाही;

ज्याचे दर्शन झाल्यांबरोबर पाहाणारा व पाहिले जाणारे
व दृश्य व द्रष्टा हे समरसपणें एकवटून जातात,

मग ज्ञान, ज्ञाता, ज्ञेय व ज्ञानाने प्राप्त होणारे
स्थान ज्याचे योगानें ब्रह्म कळतें तेंही तेंच होय.

जसा एकदा हिशेबाचा ताळा जमला म्हणजे हिशेबाच्या कच्च्या कागदांचे काम संपते,
त्या प्रमाणें ब्रह्मवस्तू प्राप्त झाली असतां तेथे साध्य व साधने ही एकवट होतात,

अर्जुना, ब्रह्माचे ठिकाणीं द्वैताचा संबंधही राहत नाहीं.
हें असो, जें ब्रह्म सर्वांच्या अंतःकरणांत असतें.

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः ।
मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ॥ १९ ॥

इति, क्षेत्रम्, तथा, ज्ञानम्, ज्ञेयम्, च, उक्तम्, समासतः,
मद्भक्तः, एतत्, विज्ञाय, मद्भावाय, उपपद्यते

याप्रमाणे क्षेत्र, ज्ञान व ज्ञेय यांचे संक्षेपतः वर्णन केले.
हीं जाणल्यानें माझा भक्त माझ्या रूपाला मिळतो.

एवं तुजपुढां । आदि क्षेत्र सुहाडा ।
दाविलें फाडोवाडां । विवंचूनि ॥ ९३४ ॥

तैसें चि क्षेत्रपाठिं । जैसें देखिलें दीठी ।
तैसे चि ज्ञान किरीटी । सांघितलें ॥ ९३५ ॥

अज्ञाना हिं कवतिकें । रूप केलें नीकें ।
जंघ आणि टेंके । पुरे ह्मणसी ॥ ९३६ ॥

आणि आतां हें रोकडें । उपपत्तिचेनि सुरवाडें ।
निरोपिलें उघडें । ज्ञेय पैं गा ॥ ९३७ ॥

हे आघवी चि विवंचना । बुद्धी भरूनि अर्जुना ।
मग सिद्धिभुवना- । माझि येंति ॥ ९३८ ॥

देहादि परिग्रहीं । सन्यासु घेउनि जिहिं ।
जीउ माझां ठांइं । वृत्तिकु केला ॥ ९३९ ॥

ते गा माझे किरीटी । हें जाणौनि सेवटीं ।
आपणपेयासाठीं । मी चि होंति ॥ ९४० ॥

तरि मी होती परि । हे मुख्य अवधारिं ।
सोहपी सर्वांपरीं । रचिली आह्मी ॥ ९४१ ॥

कडां पायेरी कीजे । निराळिं मांचु बांधिजे ।
अथाविं सूयिजे । तारितें जेवि ॥ ९४२ ॥

हे सुजाण अर्जुना, तुला क्षेत्र म्हणजे
काय हें स्पष्ट करून सांगितलें;

त्याचप्रमाणें अर्जुना, क्षेत्राचा प्रकार सांगितल्यानंतर तुला
उघड दृष्टीनें पाहतां येईल त्या रीतीनें तुला ज्ञान सांगितलें.

तुझ्या बुद्धीचे समाधान होऊन पुरे म्हणेपर्यंत सहज
कौतुकानें अज्ञानाचेंही रूप स्पष्ट करून दाखविलें.

तसेच तर्क व उपपत्ती यांच्या साह्याने तुला
ज्ञेय म्हणजे काय तें स्पष्ट करून सांगितलें.

अर्जुना, हे सर्व विवरण बुद्धीमध्यें सांठवून माझ्या
प्राप्तीची इच्छा धरून माझे भक्त मद्रूप होतात.

देहादिक परिवाराचा त्याग करून ज्यांनी
आपला जीव माझ्या ठिकाणीच स्थिर केला,

हे किरीटी, ते माझे भक्त आपले चित्त मला अर्पण
करून त्या मोबदल्यात मीच होऊन राहतात,

मद्रूप होण्याचा हाच प्रकार मुख्य आहे, असे जाण, इतर सर्वच
प्रकारा पेक्षां तोच सोपा म्हणून मीच निर्माण केला आहे.

डोंगराच्या कड्याला वर जाण्याकरितां जशा पायऱ्या कराव्यात किंवा उंच
होण्यासाठीं जसा माचा बांधावा किंवा अथांग पाण्यांत जायला जशी नाव लोटावी,

यऱ्हविं आघवें चि आत्मा । हें सांघौनु वीरोत्तमा ।
तें तूझेया मनोधर्मा । मीळेल ना ॥ ९४३ ॥

ह्मणौनि एक चि संचलें । आह्मीं चतुर्धा केलें ।
जें अदळपण देंखिलें । तूझिये प्रज्ञे ॥ ९४४ ॥

पैं बाळक जैं जेवविजे । तैं घांसु विसें ठांइं कीजे ।
तैसें एक चतुर्व्याजें । कथिलें आह्मीं ॥ ९४५ ॥

एक क्षेत्र एक ज्ञान । एक ज्ञेय एक अज्ञान ।
हे भाग केले अवधान । जाणौनि तूझें ॥ ९४६ ॥

आणि ऐसेन हिं पार्था । जरि हा अभिप्राॐ तुज हाता ।
न ये चि तरि हे वेवस्था । पुडुतिं सांघों ॥ ९४७ ॥

आतां चौं ठांइं न करुं । एक चि ह्मणौनि न सरूं ।
आत्मेयां अनात्मेयां धरूं । सरिसा पाडु ॥ ९४८ ॥

परि तुवां एतुलें करावें । मागौनि तें आह्मां देयावें ।
जें काना चि नांव ठेवावें । आपणयातें ॥ ९४९ ॥

एया श्रीकृष्णाचेया बोला । पार्थु रोमांचितु जाला ।
तेथ दॐ ह्मणति उगला । उचंबळ ना ॥ ९५० ॥

ऐसेनि तो एता वेगु । धरूनि ह्मणे श्रीरंगु ।
प्रकृतिपुरुषां विभागु । परियस सांघों ॥ ९५१ ॥

जेया मार्गातें जगीं । सांख्य ह्मणति योगी ।
जेयाचिये भाटिवेलागि । मी कपिलु जालां ॥ ९५२ ॥

तो आईक निर्दोषु । प्रकृतिपुरुषविवेकु ।
ह्मणतसे आदिपुरुखु । अर्जुनातें ॥ ९५३ ॥

एरवीं, हे वीरोत्तमा, हे सर्वच आत्मा आहे, असे जर सांगितले
असते तर, तो विचार तुझ्या बुद्धीच्या आटोक्यांत आला नसता.

तुझ्या बुद्धीचा असमर्थपणा पाहिल्याकारणानें, एकच
सर्वत्र भरलेले जें परब्रह्म, तें आम्ही चार प्रकारचें केलें.

जेव्हा बाळास भरविण्यास बसावें, तेव्हां एक घांस वीस ठिकाणीं करावा
लागतो; तसेच आम्हीं एका ब्रह्माचे चार भाग करून कथन केलें आहे.

तुझ्या ग्रहणशक्तीचें अनुमान करून, ब्रह्माचें एक क्षेत्र, एक
ज्ञान, एक ज्ञेय, एक अज्ञान, असें आम्हीं हे चार भाग केले,

तरीही माझ्या सांगण्याचा आशय तुझ्या लक्षात
आला नसेल तर ही व्यवस्था तुला पुन्हा एकदां सांगू.

आतां त्या ब्रह्माचे चार ठिकाणीं विभाग करणार नाहीं आणि ते ब्रह्म एकमेव आहे असे
म्हणून बाजूस सारणार नाहीं, तर आत्मा व अनात्मा यांचा एकराशीनें विचार करतों.

परंतु तूं एक गोष्ट कर कीं, आम्ही मागूं तें अम्हास दे.
ते मागणें हें कीं तूं आपल्या स्वतःस कानाचें नाव ठेव.

हें कृष्णवचन ऐकून अर्जुन आनंदाने रोमांचित झाला. त्यावर
देव म्हणाले, अरे, शांत हो, असा गहिंवरून येऊं नको !

अर्जुनाला येणारा हर्षाचा वेग या प्रमाणें श्रीकृष्णांनी आंवरून धरला, आणि
म्हणाले कीं, ब्रह्माचे प्रकृति व पुरुष असे दोन भाग स्पष्ट करून सांगतों तें ऐक.

ज्या तत्वज्ञानाच्या संप्रदायाला योगीजन सांख्ययोग म्हणतात
व ज्याचें पूर्णपणें वर्णन करण्याकरितां मीं कपिलावतार घेतला,

ज्यात कोणतेही दोष नाहीत असा तो प्रकती व पुरुष यांचेविषयीं
निर्दोष विचार ऐक, असे तो आदिपुरुष भगवंत अर्जुनाला म्हणाला.

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि ।
विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ॥ २० ॥

प्रकृतिम्, पुरुषम्, च, एव, विद्धि, अनादी, उभौ, अपि,
विकारान्, च, गुणान्, च, एव, विद्धि, प्रकृतिसंभवान्

प्रकृति आणि पुरुष हीं दोन्हीं अनादि आहेत असें जाण. आणि
विकार व गुण हे प्रकृतीपासून उत्पन्न झाले आहेत असें समज.

तरि पुरुषु अनादि आथि । आणि तैं चि लागौनि प्रकृति ।
समरसिं जैसीं दिवोराति । दोन्हीं अस्ति ॥ ९५४ ॥

ज्याप्रमाणे दिवस व रात्र हे दोन्ही बरोबर असतात, त्या
प्रमाणें पुरुष अनादि आहे आणि प्रकृति ही त्यावेळेपासून आहे;

कां रूप नव्हे वायां । रूपा लागलीं छाया ।
निकण वाढें धनंजया । कणेंसिं कोंडा ॥ ९५५ ॥

छाया ही रूप नव्हे, परंतु ती रूपाबरोबर असते; किंवा अर्जुना, बीं
पेरल्यावर त्याचेबरोबर ज्याप्रमाणें कण व कोंडा दोन्ही उत्पन्न होतात,

तैसिं जाण लवलटें । दोन्हिं जियें एकवटें ।
प्रकृतिपुरुषु प्रकटें । अनादिसिद्धें ॥ ९५६ ॥

त्या प्रमाणें उघड अनादिसिद्ध असलेले व एकमेकांत
मिसळलेले, असून प्रकृति-पुरुष विभक्तरूपाने प्रकट होतात,

पैं क्षेत्र एणें नावें । जें सांघितलें आघवें ।
तें चि येथ जाणांवें । प्रकृति पैं गा ॥ ९५७ ॥

अरे, क्षेत्र या नांवाने जें सर्व सांगितले,
त्यालाच प्रकृति म्हटले आहे असे जाण,

क्षेत्रज्ञु ऐसें । जेयातें ह्मणितलें असे ।
तो पुरुषु अनारिसें । न बोलों घेइं ॥ ९५८ ॥

आणि ज्याला क्षेत्रज्ञ असें म्हटलें, तोच
पुरुष आहे, असें समज. हे ओघानेच आले.

इयें अनानें नांवे । परि नित्य आन नव्हे ।
हें लक्ष्य न चुकावें । पुडुतिं पुडुतिं ॥ ९५९ ॥

क्षेत्र-क्षेत्रज्ञ, प्रकृति -पुरुष ही निराळी नावे असली, तरी त्यांत जें निरूपणाचें
तत्य आहे, ते एकच आहे, ही खूण तू विसरू नये, हे माझे वारंवार सांगणे आहे,

तरि केवळ जे सत्ता । तो पुरुषु पांडुसुता ।
प्रकृति ते समस्ता । क्रिये नांव ॥ ९६० ॥

हे पांडुसुता, ज्या सत्तेला कधींाही नाश नाही, तिला पुरुष
हे नांव आहे आणि प्रकृती हे नाव सर्व क्रियांना दिले जाते.

बुद्धि इंद्रियें अंतःकरण । इत्यादि विकारभरण ।
आणि तीन्ही गुण । सत्वादिक ॥ ९६१ ॥

बुद्धी, दहा इंद्रिये, अंतःकरण, इत्यादी सर्व कार्याचा समुदाय ज्यांपासून
विकार उत्पन्न होतांत आणि सत्व, रज तम हे तीन गुण हा संपूर्ण मेळावा

हा अघवा चि मेळावा । प्रकृती जाला जाणावा ।
हे चि हेतु संभवा । कर्माचेया ॥ ९६२ ॥

हा सर्व समुदाय प्रकृतीपासून झाला असें समज,
आणि सर्व कर्मांच्या उत्पत्तीला हीच प्रकृती कारण होते.

कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते ॥ २१ ॥

कार्यकारणकर्तृत्वे, हेतुः, प्रर्कतिः, उच्यते,
पुरुषः, सुखदुःखानाम्, भोक्तृत्वे, हेतुः, उच्यते

कार्य कारण व कर्तृत्व या सर्वाचे कारण प्रकृती हें मूळ आहे, असें म्हणतात,
आणि पुरुष हा सुखदुःखांच्या भोक्तेपणास कारण आहे असें म्हणतात.

तेथ इच्छा आणि बुद्धि । घडवी अहंकारेंसिं आदि ।
मग तिया लावीति वेधीं । कारणाचा ॥ ९६३ ॥

तें चि कारण टाकावेया । जें सूत्र धरणें उपाया ।
तेया नांव धनंजया । कार्यकारण ॥ ९६४ ॥

आणि इछा मदाचां थाविं । लागली मनातें उठवी ।
जें इंद्रिय राहाटवी । तें कर्तृत्व गा ॥ ९६५ ॥

ह्मणौनि तीन्ही इयें जाणा । कार्यकर्तृत्वकारणा ।
प्रकृति मूळ हें राणा । सिद्धांचा ह्मणे ॥ ९६६ ॥

एवं तिहिंचेनि समवायें । प्रकृति कर्मरूप होये ।
परि जेया गुणांतरा ये । तेयां चि सारिखें ॥ ९६७ ॥

जें सत्वां अधिष्टिजे । तें सत्कर्म ह्मणिजे ।
रजोगुणें निफजे । मध्यम तें ॥ ९६८ ॥

केवळ जरि तमें । जियें निफजति कर्में ।
निषिद्धें अधमें । जाणावीं तिये ॥ ९६९ ॥

ऐसिं संतासंतें । कर्में प्रकृति होतें ।
तेया तव निफजतें । सुखदुःखें गा ॥ ९७० ॥

असतिं दुःख निफजे । सत्कर्मिं सुख उपजे ।
तेयां दोहीचा बोलिजे । भोगु पुरुषा ॥ ९७१ ॥

त्या ठिकाणीं इच्छा व बुद्धी यांच्यापासून अहंकार उत्पन्न होतो; आणि
मग त्या जीवाला इच्छित वस्तू जें कारण, त्यांच्या वेधात पाडते.

त्या कारणाला प्राप्त होण्याकरिता जो उपाय करावयाचा,
अर्जुना, ह्या बाह्य प्रयत्नास कार्य असे म्हणतात.

आणि ती इच्छा प्रबळ होऊ लागली की मनाला चेतविते व नंतर
तें मन इंद्रियांकडून इच्छित करवून घेतें. त्यास कर्तृत्व म्हणातात.

म्हणून कार्य, कर्तुत्व व कारण या त्रिपुटीस प्रकृती मूळ
होय, असे सर्व सिद्धींचे राजे भगवान श्रीकृष्ण म्हणतात,

याप्रमाणे कार्य, कर्तृत्व, कारण या तिघांच्या मेळाव्याने प्रकृती कर्मरूप होते,
परंतु ज्या गुणंचा विशेष जोर होईल, त्या गुणाप्रमाणे तिचे कार्य चालते.

सत्वगुणाच्या आधिक्याने केलेल्या कर्माला सत्कर्म म्हणतात.
रजो गुणापासून उत्पन्न होतें, तें मध्यम म्हणजे काम्य कर्म होय.

व जीं कर्मे केवळ तमोगुणापासून होतात,
ती सर्व अधम कर्मे होत, तीं निषिद्ध समजावीं.

याप्रमाणे प्रकृतीपासून पुण्यरूप व पापरूप कर्मे निर्माण
होतात मग त्या कर्मापासून जें उत्पन्न होतें, तें सुखदुःख होय.

वाईट कर्मापासून दुःख उत्पन्न होतें, तर सत्कर्मामुळे सुख
निपजते आणि या दोन्ही सुखदुःखाचा भोग पुरुषाला होतो,

प्रकृतिपुरुषांची कुळवाडी । सांघतां देखैं असंघडी ।
जे आबुली जोडी । आमुला खायें ॥ ९७२ ॥

सुखदुःखें जंववेरीं । निफजति साचोकारिं ।
तंव प्रकृति उद्यमु करी । मग पुरुषु भोगी ॥ ९७३ ॥

आमुलेया आबुलिये । संगति ना सोये ।
कां आबुली जग घिये । चोज अइकां ॥ ९७४ ॥

प्रकृती व पुरुष यांचा असा अघटित व्यापार आहे कीं, ही प्रकृती म्हणजे
स्त्री कमावती आहे, ती सर्व मिळवीत असते आणि पुरुष त्याचा उपभोग घेतो.

जोंपर्यंत सुख व दुःख उत्पन्न होत आहेत असें भासतें, तोंपर्यंत
सर्व कार्य प्रकृतीच करते व भोग घेणारा पुरुष असतो.

या प्रकृतिपुरुषरूप नवराबायकोंचा संबंध नसतो आणि
एकमेकांत मेळही नाही. परंतु बायको जग प्रसवते, हे आश्चर्य ऐक.

पुरुषः प्रकृतिस्थो हि भुङ्क्ते प्रकृतिजान्गुणान् ।
कारणं गुणसंगोऽस्य सदसद्योनिजन्मसु ॥ २२ ॥

पुरुषः, प्रकृतिस्थः, हि, भुंक्ते, प्रकृतिजान्, गुणान्
कारणम्,गुणसङ्गः अस्य, सतअसत्, योनि, जन्मसु

प्रकृतीच्या ठिकाणी स्थित असलेला पुरुष तो तिच्या गुणांचा भोग घेतो.
त्याच्या बऱ्यावाईट योनीमध्ये जन्म होण्याला हा गुणांचा संगच कारण आहे,

अनंगु हा पेंधा । किवडा नसुधा ।
जीर्णु अतिवृद्धा- । पासौनि वृद्धु ॥ ९७५ ॥

तेया अडिनांव पुरुष । एऱ्हविं स्त्री ना नपुंसकु ।
हें एक ही न्हवे लोकु । प्रकृतीतव ॥ ९७६ ॥

अचक्षु अश्रवणु । अहस्तु अचरणु ।
रूप ना वर्णु । नांव आथि ॥ ९७७ ॥

आगा जेथ काहिं चि नाहिं । प्रकृतिचा भर्त्ता पाहिं ।
किं भोगणें ऐसेया हि । सुखदुःखाचें ॥ ९७८ ॥

तो तरि अकर्त्ता । उदासु अभोक्ता ।
परि इया चि पतिव्रता । भोगविजे ॥ ९७९ ॥

जियेतें अळुमाळु । रूपागुणाचा ढाळु ।
ते भलेतैसा खेळु । लेखा आणी ॥ ९८० ॥

जें ब्रह्म निरकार असून उदासीन आहे; तसेंच निर्धन असून केवळ
एकटें आहे तो संपूर्ण वृद्धाहून अतिवृद्ध म्हणजे अनादि आहे,

त्याला पुरुष हें केवळ टोपणनांव आहे; एरव्ही तो स्त्रीही नाही,
नपुसक नाही किंबहुना तो काय आहे याचा एक निश्चयच होत नाहीं.

त्याला डोळे नाहीत, कान नाहीत, हात नाहीत व पायही
नाहीत, त्याचे ठिकाणी रूप, वर्ण, नाम हेही नाहीत,

अर्जुना, अशा प्रकारे ज्याला कांहीं आहे असें म्हणतांच येत नाहीं, तो
प्रकृतीचा नवरा आहे, आणि त्यालाही तिच्यामुळें सुखदुःखाचा भोग घडतो.

तो कर्म न करणारा, उदासीन व उपभोग न घेणारा असा
जरी आहे, तरी ही पतिव्रता त्याला भोग बळेंच भोगवते !

ज्या स्त्रीला आपल्या रूपाचा व गुणांचा थोडासा अभिमान
असतो, तेवढ्यावर ती स्त्री वाटेल तो खेळ आकाराला आणते,

मा इये प्रकृती तंव । गुणमई हें चि नांव ।
किंबहुना सावेव । गुण ते चि हे ॥ ९८१ ॥

हे प्रकृति क्षणीं नवी । रूपगुणाची आघवी ।
जडातें ही माजवी । इयेचा माजु ॥ ९८२ ॥

नावें इया प्रसिद्धें । सस्नेहें इया सस्निग्धें ।
इंद्रियें प्रबुद्धें । इयेचेनि ॥ ९८३ ॥

काइ मन नपुंसक । किं ते भोगी तीन्ही लोक ।
ऐसैसें अलौकिक । करणें इयेचें ॥ ९८४ ॥

हें भ्रमाचे महाद्वीप । हे व्याप्तीचें चि रूप ।
विकार उमप । इया केले ॥ ९८५ ॥

हे कामाची मांडवी । मोहर्वनिची माधवी ।
जे प्रसिद्ध दैवी । माया ऐसी ॥ ९८६ ॥

हे वाड्ययाची वाढि । हे साकारपणा जोडि ।
प्रपंचाची धाडि । अभंग हे ॥ ९८७ ॥

कळा येथौनि जालिया । विद्या इया चि केलिया ।
इच्छा ज्ञान क्रिया । वियाली हे ॥ ९८८ ॥

हे नादाची टांकसाळ । हे चमत्काराचें वेळाउळ ।
किंबहुना सकळ । खेळु इयेचा ॥ ९८९ ॥

हे उत्पत्ति प्रळयो होंत । ते इयेचे सायं प्राप्त ।
हें असो आतां बहुत । मोहन हे ॥ ९९० ॥

हे अद्वयाचें दुसरें । निःसंगाचें सोयरें ।
हे निराळेंसि घरें । नांदति असे ॥ ९९१ ॥

म्हणून या प्रकृतीला गुणमयी असें नांव दिलें आहे;
किंबहुना गुणांचे अवयवयुक्त शरीर तीच प्रकृती !

होय, ही क्षणोक्षणी बदलणारी आहे. व रूप गुण यांनीं युक्त आहे;
आणि हिचा उन्मत्तपणा जडालाही हालचाल करावयास लावतो.

हिच्या योगानेच नांवे प्रकट होतात. हीच स्नेहाला ओलावा
देते, आणि हिच्या योगानेच इंद्रिये जाणती झाली आहेत,

हिच्यापासुन झालेले मन हे नपुंसक आहे. पण हिचें करणें असे
अलौकिक, कीं ते हिच्यायागें त्रैलोक्यांतील भोगांचा उपभोग घेतें.

ही प्रकती भ्रमाचे मोठें बेट आहे ही अमर्यादपणाची
मूर्ती आहे, हिच्यामुळेच अगणित विकार निर्माण होतात.

ही कामरूप वेलीचा मांडव असून ही भ्रान्तिवनाची
वसन्तलक्ष्मी आहे, हिला दैवी माया हे नाव तर प्रसिद्धच आहे.

शब्दसृष्टीचा विस्तार हीच करते, ही निराकाराला आकार देणारी आहे.
आणि पुरुषावर पडलेला प्रपंचाचा अखंड घाला घालणरी हीच आहे.

चौसष्ट कळा येथूनच निर्माण झाल्या, सर्व विद्याही हिनेच केलेल्या
आहेत; आणि इच्छा, ज्ञान व क्रिया यांसही हीच व्यापली आहे.

सर्व प्रकारचे नाद या प्रकृतीतूनच निर्माण होतात. ही चमत्काराचें
घर आंहे. थोडक्यात म्हणजे सृष्टीचा हा खेळ तिचाच आहे.

जगाचे उत्पत्ति आणि प्रलय जे होतात ते हिचेच प्रातःकाळ व सायंकाळ
आहेत. एकंदरींत, ही प्रकृति म्हणजे एक विलक्षण मोहिनी आहे.

ही पकृती, अद्वैत परब्रह्माचे ठिकाणी द्वैतरूपाने नांदणारी, ही संगरहिताची सोबतीण
आहे; व ही प्रकृती निराकारी पुरुषासह संसार करून कालक्रमणा करीत आहे.

इयेतें एतुलेवेर्ही । सौभाग्याची व्याप्ति थोरी ।
ह्मणौनि तेया आवरी । अनावरातें ॥ ९९२ ॥

तेयाचां तंव ठांइं । निपटौनि काहिं चि नाहिं ।
किं तेया आघवें हि । आपण होये ॥ ९९३ ॥

तेया स्वयंभाची संभूति । तेया अमूर्त्ताची मूर्त्ति ।
आपण होये स्थिति । ठाअॅं तेया ॥ ९९४ ॥

तेया अनर्त्ताची आर्त्ति । तेया पूर्णाची तृप्ति ।
तेया अकुळाची जाति । आपण होये ॥ ९९५ ॥

तेया अचर्चा चिन्ह । तेया अपाराचें मान ।
तेया अमनस्थाचें मन । बुद्धि होये ॥ ९९६ ॥

तेया निराकाराचा आकारु । तेया निर्व्यापाराचा व्यापारु ।
निरहंकाराचा हंकारु । होउनि ठाके ॥ ९९७ ॥

तेया अनामाचें नाम । तेया अजन्माचें जन्म ।
आपण हाये कर्म । अक्रिया तेया ॥ ९९८ ॥

तेया निर्गुणाचे गुण । तेया अचरणाचे चरण ।
तेया अश्रवणाचे श्रवण । चक्षु ही होये ॥ ९९९ ॥

तेया भावातीताचे भाव । तेया निरवयवाचे अवेव ।
किंबहुना होये सर्व । पुरुषाचें हे ॥ १००० ॥

ऐसे इया प्रकृती । आपुलिया सर्वव्याप्ती ।
तेया अविकृतातें विकृती- । माजि कीजे ॥ १००१ ॥

तेथ पुरुषत्व जें असे । तें ये इये प्रकृतिदशे ।
चंद्रमा अंवसे । पडिला जैसा ॥ १००२ ॥

हिच्या सामर्थ्याचा विस्तार इतका मोठा आहे, म्हणून
तर ती अनावर पुरुषालाही आटोक्यात आणते,

वस्तुतः ब्रह्माचे ठिकाणीं कोणतेच विकार नाहींत; असे जरी
आहे, तरी प्रकृती त्याचे ठिकाणी आपणच सर्व रूपाने नटते,

त्या स्वतःसिद्ध पुरुषाची आपण उत्पत्ती होते. व त्या निराकाराचा आकार आपण
बनते. ही प्रकृती आपण स्थिती होऊन त्याला राहण्याचे ठिकाण आपणच होते.

त्याला काही इच्छा नसली तरी हीच त्याची इच्छा बनते, त्या
पूर्णाची तृप्ती व त्या कुलरहिताची जाती व गोत्र आपणच होते,

त्या अवर्णनीय पुरुषाचे लक्षण, त्या अपाराचें प्रमाण
व त्या मनरहित पुरुषाचें मन व बुद्धी ही प्रकृति होते.

त्या निराकाराचा आकार; त्या व्यापाररहिताचा व्यापार आपण
होते व त्या अहंकाररहित पुरुषाचा ही अहंकार होऊन राहते.

त्या नामरहिताचे नांव, तो जन्मरहित, त्याचा ही
जन्म. आणि त्याची क्रिया, कार्य ही आपणच होते.

त्या निर्गुणाचे गुण, त्या आचरणाचे चरण, ज्याला कान
नाहीत अशाचे कान व चक्षुरहिताचे चक्षू ती आपणच होते.

त्या भावरहिताचे भाव. निरवयाचे अवयव,
किंबहुना त्या पुरुषाचे सर्व कांहीं ही प्रकृतीच होते.

अशा रीतीनें या प्रकृतीच्या व्यापक विस्तारानें
अविकारी जो पुरुष तो विकारांमध्ये ओढला जातो.

ज्याप्रमाणे अमावास्येच्या दिवशीं चंद्राचे तेज लोपतें, त्याप्रमाणें याच्या
ठिकाणीं जें पुरुषत्व असतें, तें केवळ या प्रकृतीच्या अस्तित्वानेंच आलेलें असते

विदळ बहू चोखा । मीनलेयां वाला एका ।
कसु होये पांचिका । जियापरीं ॥ १००३ ॥

कां साधुतें गोंदळिं । संचारौनि सुये मेळिं ।
नाना सुदिनाचां आभाळिं । दुर्दिनु किजे ॥ १००४ ॥

तेथ पय पशुचां पोटीं । कां वन्हि जैसा काष्टीं ।
गूंडुनि घेतला पटीं । रत्नदीपु ॥ १००५ ॥

राजा पराधीनु जाला । सिंहु रोगें रूंधला ।
तैसा पुरुषु प्रकृती आला । स्वतेजा मुके ॥ १००६ ॥

जागता नरु सहसा । निद्रा पाडौनि जैसा ।
स्वप्निचिया ही सोसा । वश्यु कीजे ॥ १००७ ॥

तैसें प्रकृति जालेपणें । पुरुषा गुण भोगणें ।
उदासु अंतौरिगुणें । आंतुडविजे ॥ १००८ ॥

तैसें अजा नित्या होए । आंगिं जन्ममृत्युचे घाए ।
वाजति जैं लांहे । गुणसंगु हा ॥ १००९ ॥

परि तें ऐसें पांडुसुता । तातले लोह पीटितां ।
जेवि वन्हीसी चि घाता । बोलिजति ॥ १०१० ॥

कां आंदोळलेया उदक । प्रतिभा होये अनेक ।
तें नानात्व ह्मणति लोक । चंद्रि जेवि ॥ १०११ ॥

दर्पणाचिया जवळिका । दूजेपण जैसें मुखा ।
कुंकुमें स्फटिका । लोहित्व होए ॥ १०१२ ॥

तैसा गुणसंगमें । हा अजन्मा जन्में ।
पावतु ऐसा गमे । यद्भवं नाहिं ॥ १०१३ ॥

अतिशय शुद्ध असलेल्या वालभर सोन्यांत थोडे हीण मिसळले
तर त्या चोख सोन्याचा कस पांचावर येऊन बसतो.

किंवा जसा सज्जन पुरुष पिशाचाचा संचार झाल्यामुळें त्याला मलीन
कर्म करण्यास भाग पाडते किंवा ढगांच्या संगाने सुदिनाचा दुर्दिन होतो,

गाईच्या कासेंतले दूध पांढरे दिसत नाहीं. अथवा लाकडांत अग्नी असतांना जसा गुप्त
असतो, अथवा वस्त्रांत तेजस्वी रत्न गुंडाळलें असतां, त्याचे तेज जसें दिसत नाहीं;

किंवा पराधीन झालेला राजा, अथवा रोगानें ग्रासलेलाजसा सिंह,
त्याप्रमाणें पुरुष प्रकृतीच्या आधीन झाल्यावर त्याचे तेज पडत नाहीं.

झोंप जशी जागृत अवस्थेंत असलेल्या पुरुषाला
स्वप्नातील वासनांच्या भोवऱ्यांत पाडते,

त्याप्रमाणें प्रकृतीच्या आधीन झाल्यामुळें पुरुषाला गुण भोगावे
लागतात. जसा उदासीन पुरुष आपल्या पत्नीमुळें सुखदःखें भोगतो,

त्याप्रमाणे जन्मरहित व नित्य अशा पुरुषाला गुणांची
संगती घडते, त्याच्यावर जन्ममृत्यूचे घाले पडतात.

परंतु अर्जुना, हें कसें आहे म्हणशील, जसें तापलेल्या लोखंडावर
घण मारले असता, तें घाव अग्नीवर बसतात असें लोक म्हणतात,

अथवां पाणी हलल्यामुळें त्यांत चंद्राचीं प्रतिबिंबे अनेक दिसतात,
अज्ञानी लोक ते प्रतिबिंबाचे नानात्व चंद्राचेच आहे असे समजतात,

आरशाच्या जवळपणामुळें एका तोंडाचीं जशीं दोन तोंडें
भासतात, कुंकवाच्या संगतीने स्फटिकाअंगीं जसे तांबडेपण येतें.

त्याप्रमाणें गुणांच्या संगतीनें जन्मरहित जो पुरुष जन्म
पावतो असे वाटते; पण तो खरोखरी जन्मत नसतो.

अधमोत्तमा योनी । या ऐसिया मानी ।
जैसा संन्यासी स्वप्नीं । अंत्यु होये ॥ १०१४ ॥

ह्मणौनि केवळ पुरुषां । नाहिं होणें भोगणें देखां ।
एथ गुणसंगू चि अशेषा । लागा मूळ ॥ १०१५ ॥

स्वप्नांत संन्यासी जसा आपल्याला अंत्यजादि जातीचा होतो,
त्याच प्रमाणें या पुरुषास नीच उच्च योनी आहेत, असें समज.

म्हणून जो पुरुष त्याला जन्ममृत्यू हे भोगावे लागत
नाहींत. मूळ कारण गुणाची असलेली संगती ही होय.

उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः ।
परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः ॥ २३ ॥

उपद्रष्टा, अनुमन्ता, च, भर्ता, भोक्ता, महेश्वरः,
परमात्मा, इति, च, अपि, उक्तः, देहे, अस्मिन्, पुरुषः, परः

प्रकृतीच्या जवळ राहून प्रकृतिधर्मापासून स्वतःस वेगळें पाहाणारा, अनुमोदन देणारा भर्ता उपभोग
घेणारा, महेश्वर, आणि असा हा दोहोमध्ये परम प्रकृतीच्या पलीकडे असून त्याला परमात्माही म्हणतात.

हा प्रकृतिमाझि उभा । परि जुइं जैसा वोथंबा ।
प्रकृति पृथ्वी नभा । तेतुला पाडू ॥ १०१६ ॥

प्रकृतिचां तटीं । मेरु हा किरीटी ।
माजि बिंबे परि लोटीं । लोटों नेणे ॥ १०१७ ॥

आणि प्रकृति होये जाये । हा तो असतू चि आहे ।
ह्मणौनि आब्रह्माचें होए । शासन हा ॥ १०१८ ॥

प्रकृति येणें जिये । या सत्ता जग विये ।
यालागि इये । वरैतु हा ॥ १०१९ ॥

अनंत काळ किरीटी । जिया मिळति इया श्रृष्टि ।
तिया रिगति एयाचां पोटिं । कल्पांतसमइं ॥ १०२० ॥

हा महद्ब्रह्मा गोसांवि । हा ब्रह्मगोळलाघवी ।
अपारपणे मवी । प्रपंचातें ॥ १०२१ ॥

पैं या देहामाझारि । परमात्मा ऐसी जे परि ।
बोलिजे ते अवधारिं । एयातें चि ॥ १०२२ ॥

हा पुरुष प्रकृतीचे ठिकाणीं आहे, परंतु जुईच्या वेलास जसा आश्रयभूत खांब उभा
केलेला असतो, तसा हा, एरवी हा आणि प्रकृती यांत पृथ्वी आणि आकाश इतके अंतर.

प्रकृतिरूप नदीच्या तीरावर पुरुष हा मेरुपर्वतासारखा अचल आहे. तिच्याम्धें
याचें प्रतिबिंब पडतें; पण तिच्या प्रवाहाबरोबर तो वाहून जात नाहीं.

प्रकृति उत्पन्न होते व लयही पावते, परंतु हा पुरुष आहे तसाच आहे;
आणि म्हणूनच हा ब्रह्मदेवापासून सर्वांचा शास्ता-नियंता होतो.

पुरुषाच्या योगानेच प्रकृतीला अस्तित्व प्राप्त होते. व याच्या
सत्तेनें जगास प्रसवते, म्हणून हा तिचा पती म्हणावा.

अनंत काळपर्यंत ज्या ज्या सृष्टी उत्पन्न होतात त्या
कल्पान्ताच्या वेळेस या पुरुषाच्या पोटींच लीन होऊन जातात.

हा, महद्ब्रह्म जी प्रकृति, तिचा स्वामी आहे, हा ब्रह्मांडाचा सूत्रधार
आहे, व आपल्या अनंत्वानें तो या सर्व प्रपंचाचे माप करूं शकतो.

या देहामध्ये परमात्मा आहे, असे म्हटले
जाते, तें यालाच बोलले जाते असें समज.

अगा प्रकृतीपरौता । एकु आथि पांडुसुता ।
ऐसा प्रवादु तो तत्वता । पुरुषु हा पैं ॥ १०२३ ॥

अर्जुना ! प्रकृती पलिकडेही एकविध पुरुष आहे
वदंता आहे, तो वस्तुतः हाच पुरुष आहे.

य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह ।
सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते ॥ २४ ॥

यः, एवम्, वेत्ति, पुरुषम्, प्रकृतिम्, च, गुणैः, सह,
सर्वथा, वर्तमानः, अपि, न, सः, भूयः, अभिजायते

जो पुरुष याप्रमाणें परमात्म्याला आणि गुणासह प्रकृतीला तत्त्वतः जाणतो,
तो सर्व प्रकारे कर्तव्य कर्मे करीत असला तरी पुन्हा जन्माला येत नाही.

जो निखळपणें येणें । पुरुषा तेया जाणे ।
आणि गुणाचें करणें । प्रकृतिचें जें ॥ १०२४ ॥

जो या पुरुषाला याप्रमाणें पूर्णपणें जाणतो,
व सारे गुणांसह प्रकृतीच करते हे जो जाणतो,

हें रूप हे छाया । पैल जळ हे माया ।
ऐसें जो धनंजया । निवाडु करि ॥ १०२५ ॥

हे रूप आहे, ही छाया आहे, पलीकडे पाणी आहे, आणि
पलिकडे भासतें, तें मृगजळ, असा निर्णय ज्याप्रमाणें करावा.

तेणें पाडें अर्जुना । प्रकृतिपुरुषविवंचना ।
जेयाचआ मना । गोचर जाली ॥ १०२६ ॥

अर्जुना, याप्रमाणें ज्यानें आपले मनाशीं प्रकृती
व प्रकृतिपुरुषांतील भेदाचा विचार स्पष्ट कळलां,

तो शरीराचेनि मेळें । करू कां कर्मे सकळें ।
परि आकाश धूमें न मैळे । तैसा असे ॥ १०२७ ॥

तो शरीरानें जरी कर्मे करीत असला, तरी आकाश जसें धूळ
उडाल्यानें मळते त्याप्रमाणे तोही त्या कर्माने लिंपित होत नाही,

आथिलेनि देहें । नेघेपे देहमोहें ।
देह गेलेयां नोहे । पुनरपि तो ॥ १०२८ ॥

जोपर्यंत देह आहे, तोपर्यंत जो देहभावानें ग्रासला जात
नाहीं. तो देहपात झाल्यावर पुन्हा जन्मांलाच येत नाहीं.

ऐसा तेया एकु । उपकारु अलौलिकु ।
प्रकृतिपुरुषविवेकु । करी पैं गा ॥ १०२९ ॥

याप्रमाणे हा एक प्रकृति-पुरुषविवेकच
त्याच्यावर अलौकिक उपकार करतो.

परि हा चि अंतरिं । विवेकु भानुचिया परी ।
उदैजे ते अवधारीं । उपाये बहुत ॥ १०३० ॥

परंतु हाच विचार अंतःकरणांत सूर्याप्रमाणें प्रकाशित
होण्यास पुष्कळ उपाय आहेत, ते सांगतो ऐक.

ध्यानेनात्मनि पश्यन्ति केचिदात्मानमात्मना ।
अन्ये साङ्ख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ॥ २५ ॥

ध्यानेन, आत्मनि, पश्यन्ति, केचित्, आत्मनम्, आत्मना,
अन्ये, सांख्येन, योगेन, कर्मयोगेन, च, अपरे

त्या परमात्म्याला काहीजण शुद्ध झालेल्या सूक्ष्म बुद्धीने ध्यानाच्या योगाने
हृदयात पाहतात. दुसरे कोणी सांख्ययोगाने आणि कांही कर्मयोगानें जाणतात.

कोण्ही एक सुभटा । विचारांचा आगिठां ।
आत्मानात्मकीटा । पुट देउनि ॥ १०३१ ॥

सतीस ही वानी भेद । तोडूनिया निर्विवाद ।
निवडति शुद्ध । आत्मतत्व ॥ १०३२ ॥

तेया आपणपेयाचां पोटीं । आत्मध्यानाचेया दीठी ।
देखति गा किरीटी । आपणपें ॥ १०३३ ॥

आणिक पैं दैवबगें । देखति सांख्ययोगें ।
एक ते आंगलगें । कर्माचेनि ॥ १०३४ ॥

हे सुभटा, कोणी विचाररूप शेगडींत आत्मा नात्माच्या हीणकटावर
ज्ञानाचे संस्कार करतात, अग्नीत पुटे देऊन, शुद्ध करतात,

छत्तीसही अनात्मरूप प्रकारचे भेद निःसंशय जाळून
आपला शुद्ध भाव निर्विवादपणें आपणामध्यें निवडतात.

आणि नंतर अर्जुना ! शुद्ध झालेल्या आपल्या ठिकाणी
आत्मध्यानरूपी दृष्टीनें ते केवळ आपल्या शुद्ध स्वरूपाला पाहतात,

दुसरे कोणी दैववशात् सांख्ययोगाच्या अभ्यासाने आत्मानुसंधान करतात
तर कोणी कर्मयोगाचे आधारानें आत्मस्वरूपाची ओळख करून घेतात.

अन्ये त्वेवमजानन्तः श्रुत्वान्येभ्य उपासते ।
तेऽपि चातितरन्त्येव मृत्युं श्रुतिपरायणाः ॥ २६ ॥

अन्ये, तु, एवम्, अजानन्तः, श्रुत्या, अन्येभ्यः, उपासते,
ते, अपि, च, अतितरन्ति, एव, मृत्युम्, श्रुतिपरायणाः

याप्रमाणें ज्यांना आत्म्याचे ज्ञान नाहीं, असे दुसरे लोक गुरुमुखानें आत्म्याचें ज्ञान ऐकून
आत्म्याची उपासना करतात. श्रुतीविषयीं परायण असे तेही मृत्युसागर तरून जातात.

येणें येणें प्रकारें । निस्तरति साचोकारें ।
हें भय भाउरें । आघवें चि ॥ १०३५ ॥

परि ते करिति ऐसें । अभिमानु दवडूनि देसें ।
एकांचेया विश्वासें । टेंकति बोला ॥ १०३६ ॥

जे हिताहित देखति । हाणि कणवा घेपति ।
पूसौनि सीणु हरिति । देंति सुख ॥ १०३७ ॥

तेयांचेनि मुखें निगे । तेतुलें आदरें चांगें ।
आइकौनियां आंगें । मनें होंति ॥ १०३८ ॥

असे अनेक लोक भावभयाचा निरास अनेक प्रकारे
करतात. या संसाररूप सागरांतून सर्व तरून जातात.

परंतु कोणी असें करतात, कीं सर्व अभिमान सोडून
श्रद्धापूर्वक एका ज्ञानी गुरुच्या वचनावर दृढ श्रद्धा ठेवतात.

ज्या गुरुनां हिताहित स्पष्ट दिसतें, जे परम कनवाळू आहेत, व शिष्याला
दुःख कशामुळें होतें, हें विचारून अवघा शीण हरण करतात आणि सुख देतात.

अशा साधुपुरुषांच्या मुखातून जे जे शब्द निघतील त्यांचा
उत्तम रीतीनें आदर करून ते आपली मनोवृत्ती तद्रूप करतात.

तेयां आयिकणेयां चि नावें । ठेविति गा आघवें ।
तेयां आखरांसि जीवें । करिति लोण ॥ १०३९ ॥

तेयापरीं कपिध्वजा । या मरणार्णवा समजा- ।
पासौनि निगति वोजा । गोमटिया ॥ १०४० ॥

ऐसे हे उपाये । बहुवस एथ पाहे ।
जाणावेया होये । एकि वस्तु ॥ १०४१ ॥

आतां असो हें बहुत । पैं सर्वार्थाचें मथित ।
सिद्धांतनवनीत । देउँ तुज ॥ १०४२ ॥

ऐतुलेनि पांडुसुता । अनुभवु लाहणा आइता ।
येर तंव तुज होंतां । सायास नाहिं ॥ १०४३ ॥

ह्मणौनि ते बुद्धि रचूं । मतवाद हे खांचूं ।
सोलींव निर्वचूं । फळितार्थु चि ॥ १०४४ ॥

या उपदेशश्रवणांतच सर्व कांही आहे असें ते श्रद्धेने मानतात व त्यांच्या
मुखातून निघणाऱ्या अक्षरावर आपला जीवभाव ओवाळून टाकतात,

हे कपिध्वजा, असे श्रद्धावान् श्रवणमार्गीही या जन्म
मरणाच्या सागरांतून नीटपणें निघून सुरक्षित होतात.

असे असे हे बहुत उपाय एकच परमात्म वस्तु
जाणण्याकरिता असे अनेक भिन्न मार्ग आहेत.

पण, आतां हा विस्तार पुरे झाला. आतां सर्वार्थाचे
मंथन करून काढलेले सिद्धान्तरूप नवनीत तुला देतो,

अर्जुना ! येवढ्यानेच तुला ब्रह्मानुभव आयताच
लाभेल; मग इतर श्रम करावे लागणार नाहीत,

म्हणून त्या सिद्धन्ताची व्यवस्थित मांडणी बुद्धीनें करू. व विरोधी
मताचे खंडन करू. सरळस्यच्छ गर्भित अर्थाचेंच व्याख्यान करूं.

यावत्सञ्जायते किञ्चित्सत्त्वं स्थावरजङ्गमम् ।
क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ ॥ २७ ॥

यावत्, सञ्जायते, कीञ्चित्, सत्त्वम्, स्थावर, जङ्गमम्,
क्षेत्र, क्षेत्रज्ञ, संयोगात्, तत्, विद्धि, भरतर्षभ

हे भरतश्रेष्ठा, जेवढे म्हणून स्थावर अथवा जंगम प्राणी उत्पन्न होतात,
ते क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांच्या संयोगानें उत्पन्न होतात, असें तूं समज.

परि क्षेत्रज्ञु एणें बोलें । तुज आपणपें जें दाखविलें ।
आणि क्षेत्र सांघितलें । आघवें चि ॥ १०४५ ॥

तेयां येरयेरांचां मेळीं । होइजे भूतीं सकळिं ।
अनिलसंगें सलीलीं । कल्लोळ जैसे ॥ १०४६ ॥

कां तेजा आणि उखरा । भेटी जालेयां वीरा ।
मृगजळाचेया पूरा । रूप होये ॥ १०४७ ॥

आतां, क्षेत्रज्ञ या नांवानें जें आत्मतत्त्व तुला
सांगितलें आणि जे संपूर्ण क्षेत्र तेही तुला सांगितले,

वाऱ्याच्या संबंधानें जशा पाण्यावर लाटा येतात, त्याप्रमाणेच क्षेत्र
व क्षेत्रज्ञ यांच्या परस्पर ऐक्यापासून या सर्व सृष्टीची उत्पत्ती होते,

अथवा सूर्यकिरण व बरड जमीन यांचा संबंध आला
म्हणजे अर्जुना, जसा मृगजळाच्या लोटाचा आभास होतो,

नाना धाराधरधारीं । झळंबली वसुंधरी ।
उठी जेवि अंकुरीं । नानाविधीं ॥ १०४८ ॥

तैसें चळाचळ आघवें । जें काहिं जीउ नावें ।
तें तो उभययोगें संभवें । ऐसें जाण ॥ १०४९ ॥

एयालागि अर्जुना । क्षेत्रज्ञा प्रधाना- ।
पासौनि न्हवंति भिन्ना । भूतव्यक्ती ॥ १०५० ॥

किंवा ज्याप्रमाणे पावसाच्या धारांनी पृथ्वी भिजली
म्हणजे तिच्या मध्यें नानाविध अंकुर जन्म पावतात,

त्या प्रमाणें जीव या नांवानें जें कांहीं सर्व चराचर आहे,
ते क्षेत्र व क्षेत्रज्ञ या दोघांच्या संगाने उत्पन्न होतात, असे जाण,

म्हणून अर्जुना, यांपैकी प्रधान तत्त्व जो क्षेत्रज्ञ, आणि प्रकृती
त्याच्या पासून ही नामरूपात्मक भूतसृष्टी वेगळी नाहीं.

समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम् ।
विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति ॥ २८ ॥

समम्, सर्वेषु, भुतेषु, तिष्ठन्तम्, परमेश्वरम्,
विनश्यत्सु, अविनश्यन्तम्, यः, पश्यति, सः, पश्यति

जो पुरुष नाशिवंत सर्व चराचर भूतांत परमेश्वर हा अविनाशी
असा एकसमस्वरूप आहे, असे जो पाहतो, तो ज्ञान्यांमध्यें डोळस आहे.

पैं पटुत्व तंतु नोहे । तऱ्ही तंतुवें चि तें आहे ।
ऐसां खोलिं डोळां पाहे । एक्य हें गा ॥ १०५१ ॥

भूतें आघविं चि होंति । एकाचिं एकिं आहाति ।
पैं भूतप्रतीति । वेगळीक असे ॥ १०५२ ॥

याचिं नावें आनानें । अनारिसिं वर्त्तनें ।
वेख ही सिनाने । आघवेयांचे ॥ १०५३ ॥

ऐसें देखौनि किरीटी । भेदु हान सूंसि पोटीं ।
तरि जन्माचिये आटी । न लाहासि निगों ॥ १०५४ ॥

पैं नानाप्रयोजनशीळें । दीर्घें वक्रें वर्त्तुळें ।
होंति येकिचिये फळें । तुंबिणिये ॥ १०५५ ॥

होंतु कां उजू वांकुडे । परि वेलिचे हें न मोडे ।
तसिं भूतें अवघडें । वस्तू उजू ॥ १०५६ ॥

हें पहा वस्त्र हें जरी तंतू नव्हे, परंतु तंतूनींच तें भासमान होतें;
त्याच प्रमाणें हें क्षेत्रक्षेत्रज्ञांचें ऐक्य खोल नजरेनें पाहिले पाहिजे.

सर्व भूतें ही एकाच वस्तूपासून होतात आणि तीं सर्व एकच
आहेत, पण ती भूते अलग अलग आहेत अशी प्रतीति येते,

या भूतांची नावेंही निरनिराळीं आहेत; वर्तनेही वेगवेगळी
असतात, आणि सर्वांचे वेषही तऱ्हतऱ्हेचे असतात.

असें पाहून अर्जुना, जर तूं भेदभावाला चित्तांत जागा देशील, तर
कोट्यवधि जन्म गेले तरी तुला या जन्मांतून बाहेर पडतां येणार नाहीं.

निरनिराळ्या उपयोगाला पडणारी व लांब, वांकडी, लांबट किंवां
गोल फळें, जशीं एकाच भोपळ्याच्या वेलीपासून उत्पन्न होतात.

किंवा बोरीचे लाकूड सरळ असो की वाकडे असो ते बोरीचेच लाकूड आहे यास
काही बाध येत नाही, तसें भूतें वाकडी तिकडी असली, तरी आत्मवस्तू सरळच आहे

अंगाकारणीं बहुवसिं । उष्णता समान जैसी ।
तैसा जीवराशी । पुरेशु असे ॥ १०५७ ॥

पुष्कळ निखारे जरी असले, तरी त्यांची उष्णता सारखीच असते; त्या प्रमाणे पुष्कळ जीवराशी जरी असल्या, तरी त्यांतील आत्मा एकच आहे;

गगनभरि धारा । परि पाणी एक वीरा ।
तैसा या भूताकारा । सर्वांगीं तो ॥ १०५८ ॥

अर्जुना, पावसाच्या धारा जरी सर्व आकाशभर असल्या, तरी त्यांतील पाणी एकच आहे, त्या प्रमाणें या भूतकारांच्या सर्वांगात तो परमात्मा आहे.

हे भूतग्राम विषय । वस्तु येथ सम ।
घठमठी व्योम । जियापरीं ॥ १०५९ ॥

हे भूतांचे समुदाय जरी निरनिराळ्या रूपरंगाचे असले, तरी ज्याप्रमाणें जसें घट आणि घरें यांमध्यें एकच आकाश असतें, तसा तो परमात्मा या सर्वांत समरूप असतो.

हा नासतां भूताभासु । एथ आत्मा अविनाशु ।
जैसा केयूरादिकिं कसु । सोनेयांचा ॥ १०६० ॥

जसे बाहुभूषणादि अलंकार भिन्नभिन्न डौलाचे असतात. पण सोन्याचा कस जसा एकच, तसा नष्ट होणाऱ्या भूतांभासामध्यें या ठिकाणीं आत्मा अविनाशी असतो.

एवं जीवधर्महीनु । जीवांसि अभिन्नु ।
जो देखे सुनयनु । ज्ञानियांमाझि ॥ १०६१ ॥

या प्रकारें आत्मतत्त्वाला जो जीवधर्मापासून अलिप्त, तरी तो सर्व जीवांमध्यें अभिन्न, असें जो जाणतो, तो ज्ञान्यांत उत्तम ज्ञानी होय,

ज्ञानाचां डोळा डोळसां- । माझि डोळसु तो विरेशा ।
हे स्तुति नोहे बहुवसा । भाग्याचा तो ॥ १०६२ ॥

हे वीरश्रेष्ठा अर्जुना, तो पुरुष ज्ञानाची दृष्टिच होय, तो पुरुष सर्व डोळस पुरुषांमध्ये डोळस होय. ही स्तुती कांहीं अतिशयोक्तीची नाहीं. तो बहुत भाग्यवंत आहे.

समं पश्यन्हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ।
न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ॥ २९ ॥

समम्, पश्यन्, हि, सर्वत्र, समवस्थितम्, ईश्वरम्,
न, हिनस्ति, आत्मना, आत्मानम्, ततः, याति, पराम्, गतिम्

कारण जो पुरुष सर्वांमध्ये समरूपाने असलेल्या परमेश्वराला समान
पाहून स्वतःच स्वतःचा घात करीत नाहीं. म्हणून तो श्रेष्ठ गतीस पावता होतो.

जें इंद्रियबोकौटिं । देहधातुची त्रिकुटी ।
पांचमेळावेयाची वोखटी । दारुण हे ॥ १०६३ ॥

हें शरीर म्हणजे गुण व इंद्रियें यांची धोकटी आहे, हिच्यांत कफ, वात व पित्त, या धातूंचें त्रिकूट आहे. जी पांचा भूतांचा दारूण आणि भयंकर मेळा आहे,

हें उघडी पांचवेउळी । हे पंचधा आंगिं लागली ।
जीवपंचानना सापडली । हरिणिकुटी ॥ १०६४ ॥

ही उघड उघड पांचनांगी इंगळीसारखी आहे, जी पांच प्रकारें शरीरास डसली आहे, देह हा जीवरूप सिंहाला सांपडलेली हरिणकुटीच होय,

ऐसां असौनि इये शरीरीं । कोणु अनन्यबुद्धीची सूरी ।
अनित्यभावाचां उदरीं । दाटी चि ना ॥ १०६५ ॥

असा जरी या शरीराचा प्रकार आहे, तरी अशाश्वतरूपी भावाच्या उदरांत, आपण नित्य आहोंत, अशी ही बुद्धिरूपी सुरी, कोण खुपसू शकत नाही हे समजत नाही,

परि इये देहीं असतां । तो नैये चि आपणपेयां घाता ।
आणि शेषिं पांडुसुता । तेथ मिळे ॥ १०६६ ॥

जेथ योगज्ञानाचिया प्रौढी । वोलांडूनि जन्मकोडी ।
न निगों या भाषा बुडी । देंति योगी ॥ १०६७ ॥

जें आकाराचें पैल तीर । तुर्येचें माजिघर ।
जे नादाची पैल मेर । परब्रह्म जें ॥ १०६८ ॥

मोक्षासगट गती । जेथें एंति विश्रांती ।
गंगादि अपांपती । सतिता जेवि ॥ १०६९ ॥

तें सुख येणे चि देहें । पाये पाखाळणियां लाहे ।
जो भूतवैषम्य नोहे । विषमबुद्धी ॥ १०७० ॥

दीपाचेया कोडी जैसें । एक चि तेज प्रकाशे ।
तैसा जो असतू चि असे । सर्वत्र ईशु ॥ १०७१ ॥

तेया समातें पांडुसुता । जीवें जो देखे समता ।
तो मरणा आणि जीविता । नांगवे फुडा ॥ १०७२ ॥

ह्मणौनि तो दैवांगळा । वानिता असों वेळोवेळां ।
साम्यसेजे डोळां । लागला जेया ॥ १०७३ ॥

तथापि अर्जुना, जो ज्ञानी आहे तो या देहांत असूनही आपला
विनाश करून घेत नाहीं, शेवटीं तो तेथें ब्रह्मस्वरूपांत मिळतो.

कोट्यवधि जन्म ओलांडून, योग व ज्ञान यांच्या बलानें, पुन्हा जन्म घेणार
नाही, अशा कृतनिश्चयानें, ज्या ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं बुडी देऊन राहतात.

जे आकाररूप नदीचा पलीकडला कांठ आहे, जे नादाची
पलीकडील मर्यादा आहे, व जे परब्रह्म तुरीयावस्थेचें मध्यघर आहे;

ज्याप्रमाणे समुद्राचे ठिकाणी गंगादि सर्व नद्यांची गती थांबते, तशा सर्व
अवस्था त्याला ब्रह्मात्मभावातच विलीन झालेल्या अनुभवास येतात.

भूतांची विषमता दिसत असली तरी ज्याची बुद्धि विषम होत
नाही, त्यास हें सुख याच देहांत पाय धुण्यास प्राप्त होतें,

अनेक दीप असले तरी त्यांचे एकच तेज सारखें असतें;
तसा तो अनादि परमात्मा सर्वत्र नेहमींच सारखा आहे.

पांडुसुता, याप्रमाणें ज्याचें जीव, आत्मा याविषयीं समत्व
आहे, तो कधीच जन्ममरणाच्या फेऱ्यात सापडत नाही,

जो साम्यरूप बिछान्यावर स्वस्थ निजला आहे, म्हणून तो फार भाग्यवान्
आहे, अशी त्या दैवशाली पुरुषाची आम्ही पुन्हा पुन्हा स्तुती करतो;

प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः ।
यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति ॥ ३० ॥

प्रकृत्या, एव, च, कर्माणि, क्रियमाणानि, सर्वशः,
यः, पश्यति, तथा, आत्मानम्, अकर्तारम्, सः, पश्यतिं

आणि जो पुरुष सर्व कर्मे सर्व प्रकारे प्रकृतीकडून केली जाणारी आहेत
हे जाणून आपल्याला, मी अकर्ता आहे असें जाणतो, तोच खरा ज्ञानी होय.

आणि मनोबुद्धिप्रमुखें । कर्मे जियें अशेखें ।
करी प्रकृति चि जो देखे । साचें जो गा ॥ १०७४ ॥

आणि मन व बुद्धी ज्यां कर्मेंद्रियात मुख्य आहेत अशी ज्ञानेंद्रियें व सर्व
कर्मेंद्रियें यांज कडून प्रकृतीच सर्व कर्मे करवीत असें जो खरेंखरें जाणतो;

घरिचीं चि राहाटति घरीं । घर काहिं न करी ।
अभ्र धांवे अंबरीं । अंबर उगें ॥ १०७५ ॥

तैसी प्रकृति आत्मप्रभा । खेळे गुणविधा शोभा ।
येथ आत्मा तो वोथंबा । नेणों कोणु ॥ १०७६ ॥

ऐसेनि ऐणें निवाडें । जेयाचां जीविं उजिवडे ।
अकर्त्तेयातें फुडें । देखिलें तेणें ॥ १०७७ ॥

घरात राहणारी माणसेच घरात वावरतात. आणि घर मात्र कांहींच करीत नाहीं,
तसेंच आकाशांत ढग धावतांना दृष्टीस पडले तरी आकाश ज्याप्रमाणें स्थिर असतें,

त्याप्रमाणे प्रकृतिमाया आत्म्याच्या तेजानें युक्त होऊन पुष्कळ खेळ खेळते,
तथापि आत्मा हा खांबासारखा असतो तो कोणते कर्म झाले, हे काही जाणत नाही,

याप्रमाणें अनुभव घेऊन ज्याच्या अंतःकरणात ज्ञानप्रकाश
झाला. त्यानें खरोखर अकर्त्या आत्म्याला जाणलें.

यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति ।
तत एव च विस्तारं ब्रह्म सम्पद्यते तदा ॥ ३१ ॥

यदा, भूत, पृथग्भावम्, एकस्थम्, अनुपश्यति,
ततः एव, च, विस्तारम्, ब्रह्म, संपद्यते, तदा

ज्या क्षणी हा पुरुष भूतांचे निरनिराळे भाव एका परमात्म्यातच असलेलें आणि त्या
परमात्म्या पासूनच सर्व भूतांचा विस्तार झाला आहे असें पाहतो, तेव्हां तो ब्रह्मसंपन्न होतो.

यऱ्हविं तैं चि अर्जुना । होइजे ब्रह्मसंपन्ना ।
जैं इया भूताकृती भिन्ना । दिसति एकिं ॥ १०७८ ॥

लहरिया जैसिया जळिं । परमाणु-कणिका स्थळीं ।
रश्मिकर मंडळिं । सूर्याचां ॥ १०७९ ॥

नातरि देहीं अवयव । मनीं आघवे भाव ।
विस्फुलिंगिं सर्व । वन्हि एकि ॥ १०८० ॥

तैसे भूतकार एकाचे । एथ दृष्टि रिगे जैं साचें ।
तैं चि ब्रह्मसंपत्तिचें । तारुं लागे ॥ १०८१ ॥

मग जिये तिये कडे । ब्रह्माची दृष्टि उघडे ।
किंबहुना जोडे । अपार सुख ॥ १०८२ ॥

एतुलेनि तुज पार्था । प्रकृतिपुरुषवेवस्था ।
ठायें ठाऔं प्रतीतिपंथा- । माजि जाली ॥ १०८३ ॥

अर्जुना, जेव्हा हे भूतांचे वेगळेपण जाऊन ती भूतें एक
आहेत असा बोध होईल, त्याच वेळी ब्रह्मसंपन्न होतां येईल.

ज्याप्रमाणे पाण्यावर त्याच्याच लहरी किंवा जमिनी
वरील परमाणूंचे कण, किंवा रविमंडळांत जसे किरण,

किंवा देहाचे ठिकाणी अवयव, एका मनाच्या ठिकाणीं
नानाविध भाव, अथवा एकाच अग्नींत जशा साकार ठिणग्या,

तसे हे भूतकार सारे एकाच अत्म्याचे आहेत ही गोष्ट कळते,
ज्ञानदृष्टीला दिसते. त्याच वेळी ब्रह्मरूप संपत्तीचे जहाज मिळेल.

मग दृष्टीला जिकडे तिकडे ब्रह्मस्वरूपच प्रकट
होतें. एवढेच नाही तर अमर्याद सुख प्राप्त होते,

पार्था, याप्रमाणें तुला प्रकृति व पुरुष यांची व्यवस्था समजावून दिली
आहे; व अनुभवसिद्ध दाखले देऊन सांगितली, ती समजली ना ?

अमृत जैसें ये चूळा । निधान जैसें देखिजे डोळां ।
तेतुला जीवाळा । मानावा हा ॥ १०८४ ॥

वांचूनि जालिये प्रतिती । घर बांधणें चित्तिं ।
तें आतां ना सुभद्रापति । यावरि ॥ १०८५ ॥

तरि एक दोनि ते बोल । बोलिजति सखोल ।
देइं मनाची वोल । मग तें घेइं ॥ १०८६ ॥

ऐसें देवें ह्मणितलें । मग बोलों आदरिलें ।
तेथ अवधानाचें केलें । सर्वांग ऐरें ॥ १०८७ ॥

जसें चूळ भरण्यास अमृत लाभावे, किंवा गुप्त ठेवा डोळ्यांना दिसावा,
तसाच हा आपल्याला परम योग्यतेचा लाभ झाला आहे असे तूं समज.

हे सुभद्रापते, हा अनुभव अंगगत झाल्यावर त्याचें मनीं
जें वसति स्थान बांधायचें, तें आतांच नाहीं, तर या नंतर.

तुला आणखी एक दोन गहन विचार मी सांगणार आहें,
ते तूं आपलें मन मला ओलीस दिल्यावर मग सांगेन.

असें श्रीकृष्ण म्हणाले आणि पुढें बोलूं लागले;
त्या वेळीं अर्जुनही तें एकाग्र चित्तानें ऐकूं लागला.

अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्ययः ।
शरीरस्थोऽपि कौंतेय न करोति न लिप्यते ॥ ३२ ॥

अनादित्वात्, निर्गुणत्वात्, परमात्मा, अयम्, अव्ययः,
शरीरस्थः, अपि, कौन्तेय, न, करोति, न, लिप्यते

हे अर्जुना, हा अविनाशी परमात्मा अनादि आणि निर्गुण असल्यामुळें अव्यय आहे; व तो
शरीरात राहात असूनही वास्तविक कांहीं करीत नाहीं, व कशानेही लिप्त होत नाहीं.

ह्मणे परमात्मा ह्मणिपे । तो ऐसा जाण सरूपें ।
जळिं जळें न सिंपे । सूर्यु जैसा ॥ १०८८ ॥

कां जळा आधिं पाठिं । सुर्यु असतू चि किरीटी ।
माजि बिंबे ते दीठी । आणिकाचिये ॥ १०८९ ॥

तैसा आत्मा देहिं । आथि ह्मणिपे हें काहिं ।
साचें तरि नाहिं । तो जेथिचा तेथ ॥ १०९० ॥

आरिसां मुख जैसें । बिंबलेया नांव असे ।
देहिं वसणें तैसें । आत्मतत्य ॥ १०९१ ॥

तेया देहा ह्मणति भेटि । हे सपाइ नीजीव गोठि ।
वारेयानि वाळुवे गांठि । केहिं आहे ॥ १०९२ ॥

अर्जुना ज्याला परमात्मा म्हणतात, तो असा आहे ज्याप्रमाणें सूर्याचे
प्रतिबिंब पाण्यांत पडलें असतां त्याजपासून तें अलिप्त असतें,

कारण अर्जुना ! तो सूर्य पाण्याच्या पूर्वी व नंतरही सारखा सतत
असतोच. याचे पाण्यात प्रतिबिंबित होणे, हे इतरांच्या दृष्टीने असते,

तद्वत् आत्मा देहांत आहे, हें म्हणणें कांहीं खरें नाहीं; कारण
तो आत्मा जेथच्या तेथेंच, आपल्या ठायीं, निरंतर असतो.

आपण आरशामध्यें आपलें मुख पाहिल्यावर त्यास प्रतिबिंब
असें आपण म्हणतों त्या प्रमाणें देहामध्यें आत्मतत्त्वाचें राहणे आहे,

त्या देहाचा व आत्म्याचा संबंध आहे हें म्हणणें साफ निरर्थक
आहे. वारा व वाळू यांची कधीं गांठ मारतां येईल काय ?

आगि आणि पींसा । दोरा सुयी जैसा ।
केउता सांदा आकाशा । पाखाणेसिं ॥ १०९३ ॥

एक निगे पूर्वाकडे । एक तें पश्चिमें पडे ।
तिये भेटिचेनि पाडें । संबंधु हा ॥ १०९४ ॥

उजियडा आंधारेया । जो पाडु मृता उभेया ।
तो चि आत्मेयां । देहा जाण ॥ १०९५ ॥

रात्रि आणि दिवसा । कनका आणि कापुसा ।
पाडु कां जैसा । तैसा चि हा ॥ १०९६ ॥

देह तंव पांचांचें जालें । कर्माचां गुणिं गुंतलें ।
भंवतसे चाकिं सूदलें । जन्ममृत्युचां ॥ १०९७ ॥

हे काळानळाचां कुंडी । घातली लोणियांची उंडी ।
मासी पांख पाखडी । तंव हें सरे ॥ १०९८ ॥

हें विपाएं आगी पडे । तरि भस्म होनि उडे ।
जाले श्वाना वरिपडें । तरि ते चि विष्टा ॥ १०९९ ॥

यां चूके दोन्हीं काजां । तरि होये क्रिमिचा पुंजा ।
ऐसा परिणामु कपिध्वजा । कश्मलु गा ॥ ११०० ॥

या देहाची हे दशा । आणि आत्मा तो ऐसा ।
पैं सिद्धु नित्यु आपैसा । अनादिपणें ॥ ११०१ ॥

सकळु ना निष्कळु । अक्रियु ना क्रियाशीळु ।
कृशु ना स्थूळु । निर्गुणपणें ॥ ११०२ ॥

आभासु ना निराभासु । प्रकाशु ना अप्रकाशु ।
अल्पु ना बहुवसु । अरूपपणें ॥ ११०३ ॥

अग्नि आणि कापूस यात दोरा कसा ओवता येईल ?
आकाश आणि पाषाण यांचां सांधा कसा बरें बसवला जाईल ?

एक मनुष्य पूर्वेकडे जावयास निघावा आणि एक पश्चिमेकडे जावयास निघावा,
तर त्यांची भेट होणे शक्य नाही, तसाच देह आणि आत्मा यांचा संबंध आहे.

उजेड व अंधार किंवा मेलेला व जिवंत यांत जे
साद्दश्य, तितकाच सारखेपणा आत्मा आणि देह यांत आहे.

रात्र आणि दिवस, सोने आणि कापूस यांचा ज्या
प्रमाणें संबंध नाहीं, तेवढाच फरक या दोहोंत आहे.

देह हा पंचमहाभूताचां बनला असून कर्माच्या गुणांनी दोरानें गुंफलेला
आहे व जन्म मृत्यूच्या चाकावर घातलेला असून गरगरां फिरत आहे.

हे शरीर काळरूपी अग्नीच्या तोंडात घातलेला लोण्याचा गोळा होय. माशीला
पंखहालण्यास जितका वेळ लागतो तितक्या थोड्या वेळांत शरीर नाहींसें होतें.

हा देह कदाचित् अग्नीत पडला तर राख होऊन उडून जातो, पण
जर का कुत्र्यांच्या तावडीं सांपडलें, तर विष्टारूप होऊन जाईल;

या दोन्ही प्रकारातून वाचले तर ते कृमिकीटकांचा पुंज
बनतें. हे अर्जुना ! याप्रमाणे या देहाचा परिणाम वाईट होतो,

या देहाची अशी दशा होते आणि आत्मा तर असा आहे
कीं, तो अनादि असल्यामुळें शाश्वत व स्वयंपूर्ण आहे.

निर्गुण असल्यामुळे तो कांळासहित नाही व काळरहित नाही.
अक्रिय नाहीं आणि सक्रियही नाहीं. कृशही नाहीं, स्थूळही नाहीं.

तो अरूप असल्यामुळें, द्दश्य नाहीं अथवा अद्दश्य नाही; तो प्रकाशयुक्त
नाहीं किंवा प्रकारहित नाहीं; तो थोडा नाही व मोठाही नाही,

रिता ना भरितु । रहितु ना सहितु ।
मूर्त्तु ना अमूर्त्तु । शून्यपणें ॥ ११०४ ॥

आनंदु ना निरानंदु । एकु ना विविधु ।
मोकळा ना बद्धु । आत्मेपण ॥ ११०५ ॥

एतुला ना तेतुला । आयिता ना रचला ।
बोलता ना उगला । अलक्षपणें ॥ ११०६ ॥

सृष्टिचां होणां न रचे । सर्वसंहारें न वेचे ।
आथि नाथि यां दोहींचें । पंचत्व तो ॥ ११०७ ॥

मवे ना चर्चे । वाढे ना खांचे ।
वीटे ना वेचे । अव्ययपणें ॥ ११०८ ॥

एवंरूपु पैं आत्मा । देहिं जे ह्मणति प्रियोत्तमा ।
तें मठाकारि व्योमा । नांव जैसे ॥ ११०९ ॥

तैसें तियाचिये आनस्यूति । होंती जांती देहाकृती ।
तो घे ना सांडी सुमती । जैसा तैसा ॥ १११० ॥

अहोरात्रें जैसीं । होंति जांति आकाशीं ।
आत्मसत्ते तैसी । देहें जाण ॥ १११९ ॥

ह्मणौनि इये शरीरीं । काहिं करवी नां करी ।
आयिता हिं व्यापारिं । सज्जु नोहे ॥ १११२ ॥

यालागि स्वरूपें । उणा पुरा नेघेपे ।
हें असो तो न लिपे । देहीं देहें ॥ १११३ ॥

तो शून्यस्वरूप असल्यामुळे, तो रिक्त नाही किंवा भरलेला नाही. कोण्या
गोष्टीने तो रहित वा सहित नाहीं. तो मूर्त नाही किंवा अमूर्त नाही,

तो आत्मस्वरूपी असल्यामुळें आनंद नाहीं अथवा आनंदरहित नाहीं;
एकत्व नाहीं कीं अनेकत्व नाहीं; तो मुक्त नाहीं अथवा बद्ध नाहीं.

तो अलक्ष असल्यामुळें इतकाही नाहीं, तितकाही नाहीं. तो आयता
नाही किंवा घडलेला आणि बोलका किंवा मुका असाही नाहीं.

सृष्टीच्या उत्पत्तीने तो उत्पन्न होत नाही कीं तिच्या संहाराबरोबर
नाशात नाहीं; आहे-नाही, या दोहोलाही नाहीसा करणारा आहे.

हा अव्यय असल्यामुळें मोजतां येत नाहीं व त्याचें वर्णन करतां येत नाहीं; तो
वाढत नाहीं अथवा कमी होत नाहीं; तो विकार पावत नाहीं व खर्च होत नाहीं.

अशा स्वरूपाचा आत्मा असतां, तो देहात आहे असें जे म्हणतात,
ते मठाकार झाले असता जसें आकाशाला मठात्व प्राप्त होतें, तसें आहे.

हे सुमते, तसें आत्म्याच्या अखंडपणासंबंधानें विचार न करितां देहाचे
आकार येतात व जातात. तो जसा पूर्वीपासून आहे तसाच असतो.

ज्याप्रमाणें आकाशांत दिवस व रात्र येतात व जातात,
तसेच आत्म सत्तेच्या आश्रयावर देहाचे येणे-जाणे घडते

म्हणून आत्मा या शरीरांत असून, तो कांहीं करीत नाहीं व करवीत
नाहीं आयतें पुढें आलेलें कर्महीं करण्यास तो सज्ज होत नाही.

म्हणून त्याच्या स्वरूपाला उणेपुरेपणा कधींच येत नाहीं;
हेही असो, या दोमध्यें असूनही तो देहाशीं लिप्त होत नाहीं.

यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते ।
सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ॥ ३३ ॥

यथा, सर्वगतम्, सौक्ष्म्यात्, आकाशम्, न, उपलिप्यते,
सर्वत्र अवस्थितः, देहे, तथा, आत्मा, न, उपलिप्यते

ज्याप्रमाणे सर्वत्र व्यापलेले आकाश सूक्ष्म असल्याकारणाने लिप्त होत
नाही त्या प्रमाणें आत्मा सर्व देहामध्यें स्थित असला तरी लिप्त होत नाहीं;

आगा आकाश कें नाहिं । हें न रिगे चि कव्हणिये ठांइं ।
परि काइसेनि हिं काहिं । गादे चि ना ॥ ११११४ ॥

तैसा सर्वत्र सर्वदेहीं । आत्मा असतू चि असे पाहीं ।
परि संगदोषें एकें हिं । लिप्तु नोहे ॥ ११११५ ॥

पुडुतिं पुडुतिं एथें । हें चि लक्षण निरुतें ।
जें जाणावें क्षेत्रज्ञातें । क्षेत्रविहीना ॥ ११११६ ॥

संसर्गे चेतविजे लोहें । परि लोह चि भ्रामक नोहे ।
क्षेत्रज्ञा आहे । तैसा पाडु ॥ ११११७ ॥

दीपकाचां अर्ची । राहाटि वाहे घरींची ।
तऱ्हीं वेगळीक कोडीची । दीपा घरा ॥ ११११८ ॥

असे काष्टाचां पोटिं । वन्हि जैसा किरीटी ।
काष्ट नोहे या दीठी । पाहिजे जेवि ॥ ११११९ ॥

अपाडु नभा आभाळा । रवी आणि मृगजळा ।
तैसा चि हा ईं डोळां । देखावा पैं ॥ ११२० ॥

अर्जुना, आकाश कोठें नाहीं ? हें कोण्या स्थळीं शिरत
नाहीं ? पण ते कशाने कधीहि ज्याप्रमाणे मळत नाही,

त्याप्रमाणे सर्वत्र देहात आत्मा मूळचाच आहे,
आणि तो एकाही संगदोषानें लिप्त होत नाही,

तर वारंवार तूं हे शुद्धतत्त्व ध्यानांत ठेव
कीं, क्षेत्रज्ञ हा क्षेत्रहीन आहे, हें समजून घ्यावें.

लोहचुंबक आपल्या संसर्गानें लोखंडाला हलवितें, परंतु लोखंड
हें लोहचुंबक नव्हे. तसाच प्रकार क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचा आहे.

दीपज्योतीच्या उजेडानें घरांतील सर्व व्यवहार करितां येतात,
परंतु दिवा व घर यांत स्वभावतः अतिशय अंतर आहे.

अर्जुना ! लाकडाच्या पोटात अग्नी असला तरी अग्नी म्हणजे
कांहीं लाकूड नव्हे; तशा दृष्टीनेच देहामध्ये आत्म्याला पाहिले पाहिजे,

आकाश व अभ्र, सूर्य आणि मृगजळ, यांतील अंतर जर तूं आपल्या दृष्टीनें
पाहूं शकशील, तर देह व आत्मा यांतील भेद जर तूं बुद्धीच्या डोळ्यानें पाहशील;

यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः ।
क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ॥ ३४ ॥

यथा, प्रकाशयति, एकः, कृत्स्नम्, लोकम्, इमम्, रविः,
क्षेत्रम्, क्षेत्री, तथा, कृत्स्नम्, प्रकाशयति, भारत

हे अर्जुना, ज्याप्रमाणे एकच सूर्य संपूर्ण ब्रह्मांडाला प्रकाशित
करतो, त्याप्रमाणे क्षेत्रज्ञ हा संपूर्ण क्षेत्राला प्रकाशित करतो.

हें आघवें चि असो एकु । गगनौनि जैसा अर्कु ।
प्रकटवी लोकु । नावें नावें ॥ ११२१ ॥

हे सर्व असू दे. ज्याप्रमाणे एकच सूर्य आकाशांत राहून
जसा निरनिराळ्या समस्त भुवनांना प्रकाशित करतो,

एथ क्षेत्रज्ञु तैसा । प्रकाशकु क्षेत्राभासा ।
यावरौतें हें न पुसा । शंका नेघां ॥ ११२२ ॥

तसा क्षेत्रज्ञ हा सर्व भासमान होणाऱ्या क्षेत्रांना प्रकाशितो.
या संबंधाने कांहीं विचारू नका व शंका घेऊं नका.

क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमन्तरं ज्ञानचक्षुषा ।
भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम् ॥ ३५ ॥

क्षेत्रक्षेत्रज्ञयोः, एवम्, अन्तरम्, ज्ञानचक्षुषा,
भूत, प्रकृति, मोक्षम्, च, ये, विदुः, यान्ति, ते परम्

अशा प्रकारे क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांतील भेद आंणि सर्व भूतांची प्रकृतीपासून सुटका
कशी होते हें जाणतात, ते महात्मे परब्रह्म परमात्म्याला प्राप्त होतात.

शब्दतत्वसारज्ञा । पैं ते चि देखणी प्रज्ञा ।
जे क्षेत्रा क्षेत्रज्ञा । अपाडु देखे ॥ ११२३ ॥

हे शब्दतत्त्वसारज्ञा, तीच बुद्धि खरी डोळस
आहे, जी क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांतील अंतर पाहते.

एयां दोंहिंचें अंतर । देखावेया चतुर ।
ज्ञानियांचे दार । आराधिति ॥ ११२४ ॥

या दोहोमधील जें अंतर जाणून घेण्याकरिता शहाणे
पुरुष, ज्ञानी पुरुषाच्या दारात नम्र सेवक होऊन राहतात,

या चि लागि सुमती । जोडीति तपसंपत्ती ।
शास्त्रांची दुभतीं । पोसिति घरीं ॥ ११२५ ॥

सुमते, हेंच समजण्याकरितां शांतिरूप संपत्ती
मिळवितात, व शास्त्ररूपी दुभत्या गाई घरीं पाळतात;

योगाचेया आकाशा । वळघिजे येवढा धिंवसा ।
याचिया चि आशा । पुरुषासि गा ॥ ११२६ ॥

हेंच जाणण्याकरिता पुरुष योगरूपी आकाशास
गवसणीघालण्याचा साहसी आटापिटा करतात.

शरीरादि समस्त । मानिताति अंतवंत ।
जीव संतांचे करित । वाहाणघर ॥ ११२७ ॥

शरीर आदिकरून सर्व तृणप्राय मानतात; आणि
जिवाभावानें संतांचे जोडेही आपल्या डोक्यावर घेतात.

ऐसिया ऐसिया परी । ज्ञानाचिया भरोवरी ।
करूनियां अंतरीं । निरुते होंति ॥ ११२८ ॥

मग अशा प्रकारांनीं ज्ञानाकरितां शरीर
कष्टवून ते अंतःकरणीं स्थिर होतात.

मग क्षेत्रक्षेत्रज्ञाचें । तें अंतर देखति साचें ।
ज्ञानें उन्मेष तेयांचे । वोवाळूं आह्मीं ॥ ११२९ ॥

मग जे क्षेत्रक्षेत्रज्ञाचे वैलक्षण्य बरोबर जाणतात,
त्यांचें ज्ञान आम्ही आपल्या ज्ञानानें ओंवाळूं.

आणि महाभूतादिकिं । प्रभेदवेलिं अनेकिं ।
पसरली असे लटकी । प्रकृति जे हे ॥ ११३० ॥

आणि महाभूतांदि अनेक पदार्थांच्या भिन्न भिन्न
रूपानें, ही लटकी मायावी प्रकती विस्तारली आहे,

ते शुकनळिकान्यायें । न लगती लागली आहे ।
हे जैसी तैसी होए । ठाउवें जेया ॥ ११३१ ॥

जैसी माळा ते माळा । ऐसें चि देखिजे डोळां ।
सर्पबुद्धि तंव टवाळा । उखी होउनि ॥ ११३२ ॥

कां शुक्ति ते शुक्ति । हें साच हे प्रतीति ।
रूपेयाची भ्रांति । जाउनियां ॥ ११३३ ॥

तैसी वेगळी वेगळेपणें । प्रकृति जैं अंतष्करणें ।
देखति ते मी ह्मणें । ब्रह्म होंति ॥ ११३४ ॥

जें आकाशाहोउनि वाड । जें अव्यक्ताची पैली कड ।
जें भेटलेयां आहाडबाहाड । पडों नेंदी ॥ ११३५ ॥

आकारु जेथ सरे । जीवत्व जेथ वीरे ।
द्वैत जेथ नुरे । अद्वय जें ॥ ११३६ ॥

तें परत्व पार्था । होतिं तें सर्वथा ।
जें आत्मानात्मवेवस्था- । राजहंस ॥ ११३७ ॥

ऐसा जी हा आघवा । श्रीकृष्णें तेया पांडवा ।
उगाणा दीधला जीवा । जीवाचेया ॥ ११३८ ॥

एरी कळशीचें एरीं । रिचविलें जेयापरी ।
अपणपें तेया हरी । दिधलें तैसें ॥ ११३९ ॥

आणि कोणा देता कोणु । तो नरु तैसा नारायणु ।
वरि अर्जुनातें कृष्णु । हा मी ह्मणे ॥ ११४० ॥

परि असो हें नाथिलें । न पुसतां कां बोलें ।
किंबहुना दीधलें । सर्वस्व देवें ॥ ११४१ ॥

जी शुकनलिकान्यायानें वस्तुतः जीवात्म्याला जडली नसतांही जडल्या
प्रमाणे भासते, अशी ही वस्तुस्थिति ज्याला पूर्णपणें माहीत आहे;

माळेच्या ठिकाणीं झालेला सर्पाचा आभास दूर होऊन,
माळ ही माळच आहे, अशीच अनुभवप्रतीती होते,

किंवा ज्याप्रमाणे शिंपेवर झालेला रुप्याचा भ्रम नाहींसा
होऊन शिंप ही शिंपच आहे, असा खरा अनुभव जसा यावा;

त्याप्रमाणे पुरुषाहून वेगळी असलेली जी प्रकृती आहे, असे
जे जाणतात, तेच ब्रह्मस्वरूपाला पावतात, असें मी म्हणतों.

जें ब्रह्म आकाशाहूनही व्यापक आहे, जें अव्यक्ताची पैलथडी,
जें लाभलें असतां साम्यासाम्याचे भेदभाव उरत नाहींत,

ज्या ब्रह्माच्या ठिकाणीं आकार संपतो, जीवतत्व जेथे
विरून जाते जिथे द्वैत उरत नाही, जे केवळ द्वैतहीन आहे.

अर्जुना ! दूध पाणी निवडण्यात प्रवीण असलेल्या राजहंसाप्रमाणे जे त्या परम
तत्त्वाच्या रूपाला, आत्मानात्मव्यवस्था जाणणारे तेच परमतत्त्वरूप होऊन राहतात.

अशा प्रकारें श्रीकृष्णांनीं आपल्या जीवांचा जीव जो पार्थ, त्याला
अशा प्रकारे प्रकृति-पुरुष विवेकाचा सर्व हिशेब पुरा करून दिला.

ज्याप्रमाणे एका कलशातील पाणी दुसऱ्या कलशात ओतावे,
त्याप्रमाणें श्रीकृष्णांनीं आपला बोध त्या अर्जुनाला दिला.

आणि अर्जुन तो नर होय तसेच श्रीकृष्ण नारायण होत. जेथें देणारा कोण आणि
घेणारा कोण ? याशिवाय अर्जुनाला तर श्रीकृष्ण हा तो मीच आहे असें म्हणाले.

पण ते असो. हे संबंध नसलेलें बोलणें राहूं द्या. न विचारता मी व्यर्थ
का बोलावे ? फार काय सांगावें ! देवांनीं अर्जुनास आपलें सर्वस्व दिलें.

किं तो पार्थु मनीं । आझुइं धणि न मनी ।
अधिकाधिक उतान्ही । वाढवीतु असे ॥ ११४२ ॥

स्नेहाचिया भरोवरी । आबुथिला दीपु घे थोरी ।
चाड अर्जुनाचां अंतरिं । परिसतां तैसी ॥ ११४३ ॥

येथ सुगरणि उदारें । रसज्ञें जेवण्हारें ।
मिळति मग अवतरे । हातु जैसा ॥ ११४४ ॥

तैसें जी होंतसे देवा । तेया अवधानाचेया लवलवा ।
वाखाण चढलें थांवा । चौगुणेवेर्ही ॥ ११४५ ॥

सुवायें मेघु सांवरे । जैसा चंद्रें सिंधु भरे ।
तैसा मातला रसु आदरें । श्रोतेयाचेनि ॥ ११४६ ॥

आतां आनंदमय आघवें । विश्व चि कीजैल देवें ।
तें रायें परिसावें । संजयो ह्मणे ॥ ११४७ ॥

एवं जे महाभारती । व्यासें अप्रांतमती ।
भीष्मपर्वि शांतिं । ह्मणितलीं कथा ॥ ११४८ ॥

तो कृष्णार्जुनसंवादु । नागरिं बोलिं विशदु ।
सांघों दाउं बंधु । वोवियेचा ॥ ११४९ ॥

नसुदी चि शांतीकथा । आणिजैल किर वाक्पथा
परिं श्रिंगाराचां माथां । पावो ठेवति ॥ ११५० ॥

दाउं वेल्हाळ देशी नवी । जैसी साहित्यातें वोजावी ।
अमृता ही चूकि ठेवी । गोडिसेपणें ॥ ११५१ ॥

बोलु वोल्हावितेनि गुणें । चंद्रासि घे उमाणें ।
रसुभंगु भुलवणें । नादु लोपी ॥ ११५२ ॥

परंतु भगवंतांनीं इतकें जरी सांगितलें, तरी अर्जुनाच्यामनाची तृप्ती
कांहीं होईना. त्याची ज्ञानश्रवणाची हांव अधिकाधिकच वाढत चाललीं.

तेल जास्त घातले की दीप जसा जास्त प्रदीप्त होतो तसा
अर्जुनाच्या अंतःकरणाचा उत्सुकपणा या श्रवणानें जास्तीच वाढला.

या वेळी, जशी वाढणारी, सुग्रण आणि सढळ हाताची असावी व रसमर्मज्ञ जेवणारे
भोक्ते मिळाले आहेत, मग जेवण्यास व वाढण्यास, हात जसा पुढें सरसावतो;

महाराज, तसें श्रीकृष्णास झालें. अर्जुनाची श्रवणोत्सुकता
पाहून देवांनाही व्याख्यानास चौपटीपेक्षां जास्त जोर आला.

अनुकूल वाऱ्यानें पाऊस पाडणारे मेघ जसे जमतात, कंवा चंद्रदर्शनानें जसें समुद्राला
भरतें येतें, त्याप्रमाणें ऐकणाराच्या आदरबुद्धीनें वक्त्यास बोलण्याचें स्फुरण येतें.

तेव्हां संजय म्हणाला, राजा धृतराष्ट्रा आता पुढे भगवान श्रीकृष्ण
सर्व विश्वाला आनंदभरित करणार आहेत, तर महाराजांनी ते ऐकावे.

याप्रमाणें महाभारतांत भीष्मपर्वाच्या संगतींत श्रीव्यासमुनींनीं
अगाध बुद्धीनें रसयुक्त अशी जी गीता कथा सांगितली,

तो कृष्णार्जुनांचा संवाद उत्तम माराठीं भाषेंत
ओंवीबद्ध काव्यांत सुंदर शब्दांनी विषद करून सांगूं.

केवळ शांतरसाची कथा शब्दांनीं सांगितली जाईल.
ती श्रृंगाररसाच्याही डोक्यावर पाय ठेवील,

देशी मराठीच भाषा, पण ती मी अशा कौशल्याने योजीन. की ती
साहित्याला अलंकारासारखी होईल, व गोडपणाने अमृतालाही नावे ठेवील.

माझे शब्द, चंद्रापेक्षा जास्त शीतलता देतील आणि यांच्या
रसाळ पणाच्या भुलवणींत नादब्रह्म देखील लोपून जाईल;

खेचरांचेया ही मना । आणी सात्विकाचा पान्हा ।
श्रवणास्वें सुमना । समाधि जोडे ॥ ११५३ ॥

तैसा वाग्विलासु विस्तारुं । गीतार्था विश्व भरुं ।
आनंदाचें आवारुं । मांडूं जगा ॥ ११५४ ॥

फीटो विवेकाची वाणि । हो काना मना जीणि ।
देखों आवडे ते खाणि । ब्रह्मविद्येची ॥ ११५५ ॥

दिसो परतत्व डोळां । पाहो सुखाचा सोहळा ।
रिगो महाबोधु सुकाळा- । माजि विश्व ॥ ११५६ ॥

हें निफजे आतां आघवें । ऐसें बोलिजैल बरवें ।
जें अधिष्ठलां असें परदेवें । निवृत्ती मीं ॥ ११५७ ॥

ह्मणौनि आखरीं सुभेदिं । उपमाश्लेषकोंदाकोंदी ।
झाडा देईन प्रतिपदीं । ग्रंथार्थासि ॥ ११५८ ॥

हा ठाॐघेरि मातें । पुरतेयां आहे सारस्वतें ।
केलें असे श्रीमंते । गुरुरायें ॥ ११५९ ॥

तेणें जी कृपासावायें । मी बालें तेतुलें सामाये ।
आणि तुमचिये सभे लाहें । गीतार्थु ह्मणों ॥ ११६० ॥

वरि तुह्मा संतांचे पाये । आजि मी पातलां आहें ।
ह्मणौनि जी नोहे । अटक काहिं ॥ ११६१ ॥

प्रभू काश्मिरिं मूकें । नुपजे जी कवतुकें ।
नाहिं गुणिं सामुद्रिकें । लक्ष्मीयेसि ॥ ११६२ ॥

तैसी तुह्मा संतांपासिं । अज्ञानाची गोठि काइसी ।
यालागि नवरसिं । वरिखैन मीं ॥ ११६३ ॥

खेचर म्हणजे आकाशात संचार करणारी पिशाच्चे त्यानांही सात्त्विकरसाचा
पान्हा फुटेल. आणि हिच्या श्रवणानेंच संतांच्या मनाची आत्मसमाधी लागेल !

मी आतां असा वाग्विलास प्रकट करणार आहे, कीं त्याच्यायोगें संपूर्ण
विश्वात भगवद्गीतेचा अर्थ प्रकट करू या जगालाच आनंदाचे आवार बनवू.

हें व्याख्यान ऐकून विवेकाचे उणेपण सरो. कान व मन असण्याचे
सार्थक होवो व ब्रह्मविद्येची खाणच लोकांना उपलब्ध होवो.

सर्वांच्या डोळ्याला एक सर्वत्र परब्रह्मच दिसो. सर्वांना सुखाचें
पर्व उघडो, आणि संपूर्ण विश्वाला ब्रह्मबोधाचा सुकाळ होवो,

मजवर श्रीनिवृत्तिनाथमहाराजांचा अनुग्रह असल्यामुळें, हें सर्व कांहीं
आतां खास घडून येईल, असे मी आता सुंदर निरूपण करणार आहे,

म्हणून ग्रंथाचा अर्थ सांगतांना उपमा व श्लोक यांचे बहुपण
करून या गाताग्रंथांतील प्रत्येक पदाचा अर्थ स्पष्ट करून सांगेन.

हे मला करता येईल कारण श्रीमंत श्रीगुरु निवृत्तिनाथांनी मला
वाणीच्या प्रगल्भपणानें आणि अर्थज्ञानानें परिपूर्ण केलें आहे.

अहो, या गुरुमहाराजांच्या कृपेच्या साह्याने मी जें जें बोलतो, तें तें तुम्हांला मान्य
होत आहे आणि या संतमंडळींच्या सभेंत गीतार्थ सांगण्याची मला योग्यता आली आहे,

तशांत, तुम्हां संतांच्या चरणस्पर्शाचा लाभ मला
झाला आहे, म्हणून मला कसलीही अडचण पडत नाहीं.

महाराज सरस्वतीच्या पोटी मुकें मूल उपजेल कसें ? लक्ष्मीच्या
हातावर सामुद्रिक चिन्हांची उणीव असूं शकणार नाहीं;

त्याप्रमाणे तुम्हां संतांजवळ अज्ञानाची गोष्ट कोठून
राहणार ! तेंव्हा मी निरूपणात नवरसांचा वर्षाव करीन.

किंबहुना आघवां । मज अवसरु देयावा ।
ज्ञानदॐ ह्मणे बरवा । सांघैन ग्रंथू ॥ ११६४ ॥

फार काय सांगू ? देवा, मला बोलण्याला आतां संधी द्यावी, म्हणजे
मग हा ज्ञानदेव गीताग्रंथ उत्तम प्रकारें स्पष्ट करून सांगेल.

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रें
श्रीकृष्णार्जुनसंवादे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगो नाम त्रयोदशोऽध्यायः